cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३२५ | गुरूवार, दि.२० मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

### संपादकीय

## सामाजिक विभागणी परवडणारी नाही

औरंगजेबाची कबर काढून टाकण्याच्या मुद्द्यावर महाराष्ट्रातील वातावरण सध्या चांगलेच तापले असून, नागपूरमधील दंगलसदृश स्थिती म्हणजे कायदा व सुव्यवस्था ढासळल्याचेच निदर्शक म्हणता येईल. राज्यातील जनतेने भाजपा, शिवसेना आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीला विधानसभा निवडणुकीत बहुमताने निवडून दिले. स्पष्ट बहुमतामुळे स्थिर, भक्कम व गतिमान सरकार मिळेल, अशी खरे तर राज्यातील जनतेची अपेक्षा होती. तथापि, सध्याचे महाराष्ट्रातील वातावरण वेगळ्याच दिशेने जात असून, सरकारही त्यामागे फरफटत जात असल्याचे पहायला मिळते.

## दहशतवादी घटनांमध्ये ७१ टक्क्यांची घट

नवी दिल्ली–दहशतवादाच्या मुद्द्यावर राज्यसभेत बोलताना गृह राज्यमंत्री नित्यानंद राय म्हणाले, मोदी सरकारचे दहशतवादाबद्दल शून्य सहनशीलतेचे धोरण आहे. सरकार दहशतवाद संपवण्यासाठी सर्व पावले उचलत आहे. परिणामी, दहशतवादी कारवाया ७१ टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. पूर्वी दहशतवाद्यांचा गौरव केला जात होता, त्यांना चांगले जेवणही दिले जात होते, परंतु आता पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या दहशतवादाविरुद्धच्या शून्य सहनशीलतेच्या धोरणामुळे, अंतर्गत भागात दहशतवादी घटना शून्य आहेत. दहशतवादी एकतर तुरुंगात जातील किंवा नरकात जातील, असे ते म्हणाले.

# ३१ मार्चपूर्वीच जमा होणार खरीप पीकविमा

## २१९७.१५ कोटी रुपयांचा निधी मंजूर, कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंची विधानसभेत घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

**पंतप्रधान पीक विमा योजनेतून खरीप २०२४ ची नुकसान भरपाई देण्यासाठी २१९७.१५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्य सरकार हिस्सा विमा कंपन्यांना उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया प्रगतीवर आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याचं वाटप ३१ मार्चपूर्वीच करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी बुधवारी (दि.१९) विधीमंडळात दिली आहे.**

कोकाटे म्हणाले, ''३१ मार्चच्या पूर्वी राज्यातील सर्व शेतकऱ्यांना पीक विम्याचे वाटप करण्यात येईल. राज्य सरकारकडून विम्याचा हप्ता कंपनीला उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे. सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. त्यामुळे वित्त विभागाकडून निधी मंजूर करून घेण्यासाठी वेळ लागेल. परंतु ३१ मार्चपूर्वी राज्यातील शेतकऱ्यांचे खरीप २०२४ चे विमा भरपाई रक्कम जमा करण्यात येईल.'' अशी ग्वाही कृषिमंत्री कोकाटे यांनी दिली आहे. यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे




आमदार राहुल पाटील यांनी मात्र राज्य सरकारवर टिका केली. पाटील म्हणाले, ''खरीप पीकविमा ऑगस्ट महिन्यात जमा होणे अपेक्षित होते. पण राज्य सरकारने कंपन्यांना वेळेवर हिस्सा दिला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना हक्काचा विमाही वेळेवर मिळाला नाही, असे पाटील म्हणाले. तसेच पीक विमा कंपन्या मंजूर पीक विमाही शेतकऱ्यांना वाटप करत नाहीत. बँकांकडून त्यावरील व्याज घेतात परंतु शेतकऱ्यांना विमा रक्कम देत नाहीत, याकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार राजेश विटेकर यांनी लक्ष वेधले. दरम्यान, राज्यातील ◀◀ पान २ वर

### पीक विमा कंपन्यांकडून शेतकरी वेठीस

खरीप हंगाम २०२४ चा पीकविमा अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले नाहीत. पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना जाणीवपूर्वक वेठीस धरले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची प्रलंबित पीक विमा रक्कमेवरून विधीमंडळात प्रश्न उपस्थित करण्यात आला. आमदार राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार राजेश विटेकर आणि भाजपच्या आमदार श्वेता महाले यांनी लक्षवेधी उपस्थित केली. त्यावर उत्तर देताना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे बोलत होते.

# बीड पोलिस ॲक्शन मोडवर; भोसले गँगला लावला मकोका

## गुन्हेगार वटणीवर येणार; सिरसाळ्याच्या एकावर एमपीडीएअंतर्गत कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख खून प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी चर्चेत आल्याने चोहूबाजूने टिका होऊ लागली. पोलिस अधिक्षक म्हणून नवणीत काँवत हे आल्यापासून त्यांनी कारवाईचा धडाका लावला असून बीड पोलिस सध्या ॲक्शन मोडवर असल्याचे दिसते. आष्टी तालुक्यातील भोसले गँगवर मकोका तर सिरसाळा येथील एकावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.**

आष्टी तालुक्यात जानेवारी महिन्यात वाहिरा शिवारात हाणामारी होऊन यात दोघांचा खून करण्यात आला होता. या प्रकरणी टोळी प्रमुख दिपक उर्फ सलिम नारायण भोसले याच्यासह ९ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सध्या हे प्रकरण न्याय प्रविष्ट असून यातील ६ जण अटकेत असून तीघे फरार आहेत.



भोसले टोळीने आतापर्यंत १३ गुन्हे हे संघटितरित्या केले असून ते गंभीर स्वरुपाचे आहेत. ही बाब पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांच्या निदर्शनास आल्याने अंभोरा पोलिस ठाण्याचे सपोनि मंगेश साळवे यांना मकोका अंतर्गत भोसले टोळीवर कारवाई करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना दिल्या. ◀◀ पान २ वर

## तीन दरोड्याचा लावला छडा; ४ दरोडेखोर गजाआड

**पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांनी स्थानिक गुन्हे शाखेला जिल्ह्यात घडलेल्या गुन्ह्यांचा तपास करत आरोपी निष्पन्न करुन त्यांना गजाआड करण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार गुन्हे शाखेने चकलांबा आणि शिरुर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या तीन दरोड्याचा छडा लावला असून यातील चार दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या आहेत.**

पोलिस अधिक्षकांच्या आदेशानुसार स्थागुशाचे पोलिस निरीक्षक शेख उस्मान यांनी पोलिस उपनिरीक्षक सिध्देश्वर मुरकुटे आणि श्रीराम खटावकर यांच्या पथकावर ही कामगिरी सोपवली. त्यानुसार शोध सुरु झाल्यावर पोलिस हवालदार सोमनाथ गायकवाड यांना दि. १८ मार्च रोजी ती



दरोडे व दरोडेखोरांबाबत गोपनीय माहिती मिळाली. पोलिस पथकाने तातडीने पाथर्डी तालुक्यात जावून निखिल बंडू काळे, (वय २०, रा. टाकळी मानूर), अविनाश बंडू काळे (वय २४, रा. टाकळी मानूर), रजाक जनार्दन ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### दादा खिंडकरच्या पोलीस कोठडीत वाढ

बीड–दादा खिंडकर व ज्योतीराम भट्टे यांच्या पोलीस कोठडीत दोन दिवसांची वाढ झाली आहे. सात दिवसाची पोलीस कोठडी संपल्यानंतर बुधवारी बीड न्यायालयात त्यांना हजर केले होते. न्यायालयाने त्यांना २१ मार्च पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. अमाणूष मारहाण करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता. तसेच यातील तिसरा आरोपी योगेश चव्हाणलाही २१ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### बीड जिल्ह्यात २ एप्रिलपर्यंत मनाई आदेश लागू

बीड –जिल्ह्यात २ एप्रिलपर्यंत मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. जातीय तेढ निर्माण होण्याच्या शक्यतेमुळे मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत. त्यानुसार १९ मार्च ते २ एप्रिलपर्यंत मोर्चे, सभा आणि आंदोलनावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

### विठ्ठल–रुक्मिणी मातेच्या पूजेची ऑनलाईन नोंदणी

पंढरपूर– श्री विठ्ठल– रुक्मिणी मातेच्या पूजेची २५ मार्चपासून ऑनलाईन नोंदणी होणार आहे. ०१ एप्रिल ते ३१ जुलैमधील पुजांची ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. भाविकांना आता घरबसल्या विविध पुजेची ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. विठ्ठल रुक्मिणी मातेची महापूजा, पाद्य पूजा, तुळशी अर्चन पूजा तसेच चंदनउटी पूजेचा देखील समावेश करण्यात आला आहे.

### राष्ट्रपतींकडून खासदारांना निमंत्रण

नवी दिल्ली : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महाराष्ट्रातील सर्व खासदारांना निमंत्रण दिले आहे. सर्व खासदारांना राष्ट्रपतीकडून नाश्त्यासाठी निमंत्रण देण्यात आले आहे. राज्यातील सर्व खासदार राष्ट्रपती भवनात दाखल झाले आहेत. राज्यसभेच्या आणि लोकसभेच्या खासदारांना राष्ट्रपतींकडून निमंत्रण देण्यात आले आहे. सर्वपक्षीय खासदार आणि मंत्र्यांनाही राष्ट्रपतीभवनाकडून निमंत्रण दिले गेले आहे.

### टेम्पोतील आगीत चौघांचा होरपळून मृत्यू.

पुणे–हिंजवडीत टेम्पो जळून खाक झाला असून या आगीत टेम्पोतील चौघांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना बुधवारी घडली. चौघेही कंपनीचे कर्मचारी होते. व्योमा ग्राफिक्स कंपनीचे एकूण १२ कर्मचारी या टेम्पोत होते. त्यावेळी हिंजवडी फेज वन मध्ये चालकाच्या पायाखाली अचानक आग लागली. त्यावेळी चालक आणि पुढचे कर्मचारी तातडीने खाली उतरले मात्र मागचे दार न घडल्याने चौघांचा होरपळून मृत्यू झाला.

# जिलेटीनच्या स्फोटात कामगाराचा मृत्यु

## तळेगांव शिवारातील घटना: दोघांची प्रकृती चिंताजनक

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील तळेगांव घाट शिवारात एका शेतकर्याच्या शेतामध्ये वैयक्तीक जलसिंचन विहीरीचे काम सुरू होते या कामावर ब्लास्टींग करतांना जिलेटींगचा स्पोट झाल्याने एक कामगार ५० फुट विहीरीच्या बाहेर येवून परत विहीरीत पडला याचा जागीच मृत्यु झाला तर अन्य तीघेजन जखमी झाले असून दोघांची प्रकृती चिंताजनक आहे, तर एकावर स्वा.रा.ति. रूग्णालयात उपचार सुरू आहे. ही घटना बुधवार सकाळी ११.३० वा. घडली.



अंबाजोगाई तालुक्यातील तळेगांव घाट तांडा शिवारात उत्तम पांडुरंग आडे यांना शासनाची वैयक्तीक जलसिंचन विहीर मंजुर झाली होती या विहीरीचे काम सुरू असताना मंगळवारी या विहीरीमध्ये जिलेटींगचे स्फोट घेण्यात आले. उर्वरीत राहीलेल्या कामाचे ◀◀ पान २ वर

### नागपूर दंगल: १३० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

नागपूर–अफवा आणि वादग्रस्त पोस्ट टाळण्यासाठी पोलिसांचा कडक बंदोबस्त असून सोशल मीडिया पेट्रोलिंग सुरू आहे. धार्मिक स्थळांवर सुरक्षा वाढवली आहे. संभाव्य तणाव टाळण्यासाठी पोलिसांचा अतिरिक्त फौजफाटा तैनात असून कोम्बींग ऑपरेशनमध्ये १५० जणांची चौकशी केली असून १३० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

# संतोष देशमुख हत्येचा खटला बीड न्यायालयात चालणार

**बीड । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा खटला बीड सत्र न्यायालयात चालणार आहे. या प्रकरणाची पहिली सुनावणी केज न्यायालयात झाली होती. आता पुढचा खटला हा बीड सत्र न्यायालयात चालणार आहे.**



संतोष देशमुख यांची ३ महिन्यांपूर्वी निर्घृणपणे हत्या करण्यात आलेली होती. त्यानंतर या गुन्ह्याचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आलेला होता. तपासात ८ आरोपींना दोषी ठरवण्यात आले असून त्यातील ७ आरोपी पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. तर कृष्णा आंधळे हा आरोपी अद्याप फरार आहे. सर्व आरोपींवर मकोका दाखल करण्यात आलेला आहे. या संपूर्ण प्रकरणाचा मास्टर माइंड समजला जाणारा वाल्मिक कराड हा आरोपी ◀◀ पान २ वर

## नागपूरातील हिंसक प्रकरणानंतर औरंगजेबाची कबर आता नो ड्रोन झोन

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

मुघल शासक औरंगजेबाची कबर उघडून फेकून द्या म्हणून दोनच दिवसांपूर्वी नागपूरात विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्यावतीने मोर्चा काढण्यात आला. त्याचे पडसाद त्याच रात्री उमटत हिंसाचाराची घटना घडली. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथील मुघल शासक औरंगजेबाची कबर ''नो ड्रोन'' झोन म्हणून छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी घोषित केल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

सोशल मीडियावर, पोलिस या प्रकरणावरील ''आक्षेपार्ह'' पोस्ट शोधण्यात आणि त्या हटवण्यात व्यस्त आहेत, असे दुसऱ्या एका अधिकाऱ्याने सांगितले. आतापर्यंत अशा ◀◀ पान २ वर

# खोक्या भोसलेच्या विरोधात आजपासून आझाद मैदानावर उपोषण

## शेकडो वन्यजीव प्रेमी मुंबईकडे रवाना; मकोका लावण्यासाठी आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातून शेकडो वन्य जीव प्राणी मित्र बुधवारी सायंकाळी मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. सतीश उर्फ खोक्या भोसले याच्या विरोधात गुरुवारपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण केले जाणार आहे. खोक्याला मकोका लावण्यात यावा यासह त्याच्या आकाला सहआरोपी करण्याची मागणी करण्यात येत आहे. ◀◀ पान २ वर



### मकोका लावला जात नाही तोपर्यंत माघार नाही–आघाव, सिरसाट

खोक्याचे सीडीआर तपासण्यात यावेत, त्याचा कोणत्या राजकीय नेत्याशी संबंध आहे, हे त्यातून उघड होईल, हरणाची शिकार करुन तो त्याचे मांस कोणाला देत होता, याचा शोध घ्यावा. तसेच खोक्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात याव्यात, अन्यथा उपोषण मागे घेतले जाणार नसल्याचे वन्यप्रेमी माऊली सिरसाट आणि मोहन आघाव यांनी सांगितले आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ११९.०० क्विंटल | २,५०० | २,८०० | २,६१६ |
| ज्वारी/हायब्रिड: २२३.०० क्विंटल | १,८०० | ३,३०१ | २,४३३ |
| मका/लोकल:३५.०० क्विंटल | २,०९० | २,११० | २,१०० |
| तूर : ४२.५० क्विंटल | ६,६७० | ७,००१ | ६,८७४ |
| उडीद : ६.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ५५.०० क्विंटल | २,५३६ | २,९६१ | १२,८२४ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: १७.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| हरभरा: १०६.५० क्विंटल | ४,९०० | ५,१०० | ५,०१३ |

# नेत्यांच्या लाडक्या शिक्षकांना सिईओंचा दणका!

## सर्व शिक्षक संवर्गातील प्रतिनियुक्त्या रद्द; मुळ पदस्थापनेवर हजर न राहिल्यास कारवाई–आदित्य जिवाने

**बीड । प्रतिनिधी**

विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांच्या मान्यते शिवाय आपल्या अधिनस्त जे शिक्षक संवर्गातील कर्मचारी कार्यालयात प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. त्यांच्या प्रतिनियुक्त्या तात्काळ रद्द करून आपल्या स्तरावरून मूळ पद स्थापनेच्या ठिकाणी हजर होण्याकरता तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे असे लेखी आदेश बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी, ◀◀ पान २ वर




### काही जण १० वर्षापासून ठाण मांडून

प्रतिनियुक्तीवर असलेले बरेच शिक्षक हे गेल्या १० ते १५ वर्षा पासून पंचायत समिती, तहसिल, गटशिक्षणाधिकारी कार्यालयात खुर्चीला चिकटून बसले होते. स्थानिक नेत्यांचा त्यांना आशिर्वाद असल्याने नेत्यांचा पीए असल्यासारखे ते त्या कार्यालयात वावरत होते. आता या सर्वांना आपल्या मुळ पदस्थापनेवर हजर राहावे लागणार आहे.

### नियम काय सांगतो?

निवडणुक काळ व जनगणनेचा काळ वगळता कोणत्याही शिक्षकाला पंचायत समिती, तहसिल, गटशिक्षणाधिकारी कार्यालयात प्रतिनियुक्तीवर राहता येत नाही. तसा कायदा २००९ ते २०१० या दरम्यान झालेला आहे. या कायद्याचे उल्लंघन झाल्यावर संबंधित अधिकारी व त्या शिक्षकावर दंडात्मक कारवाई कारण्याची त्यात तरतुद असल्याचे समजते.

cmyk

अग्रलेख

# सामाजिक विभागणी परवडणारी नाही

औरंगजेबाची कबर काढून टाकण्याच्या मुद्द्यावर महाराष्ट्रातील वातावरण सध्या चांगलेच तापले असून, नागपूरमधील दंगलसदृश स्थिती म्हणजे कायदा व सुव्यवस्था ढासळल्याचेच निदर्शक म्हणता येईल. राज्यातील जनतेने भाजपा, शिवसेना आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीला विधानसभा निवडणुकीत बहुमताने निवडून दिले. स्पष्ट बहुमतामुळे स्थिर, भक्कम व गतिमान सरकार मिळेल, अशी खरे तर राज्यातील जनतेची अपेक्षा होती. तथापि, सध्याचे महाराष्ट्रातील वातावरण वेगळ्याच दिशेने जात असून, सरकारही त्यामागे फरफटत जात असल्याचे पहायला मिळते.

मुघल सम्राट औरंगजेब हा क्रूर शासक होता, याबद्दल कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही. त्यामुळे औरंगजेबाचे कुणी उदात्तीकरण करत असेल, तर तेही चूक म्हटले पाहिजे. सपाचे नेते अबू आझमी यांनी अशीच चूक केली. त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई झाली, हे योग्यच ठरावे. तथापि, कोकणातील नितेश राणे यांच्यासारखे नेते हिंदुत्ववादी चेहरा बनण्याच्या आवेशात वादग्रस्त मुद्देच मांडत असतील, तर यातून महाराष्ट्रातील वातावरण कलुषित होण्याचाच धोका संभवतो. सुरूवातीला अमक्या समाजाकडून तमुक वगैरे घेऊ नका, असा सल्ला या महाशयांनी दिला. एका जबाबदार पदावरील मंत्री अशी सामाजिक विभागणी करणारी विधाने करीत असेल, तर त्याला खरे तर राजधर्माची आठवण करून दिली पाहिजे. ती त्यांना उशिराने का होईना करून दिली गेली, हे बरे झाले. तसा औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दाही नितेश यांनीच पुढे आणल्याचे दिसून येते. त्यानंतर खुल्ताबादमधील औरंगजेबाची कबर काढली पाहिजे, या मागणीसाठी धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांच्यासह विविध संघटनाही आक्रमक झालेल्या दिसतात. कबर न काढल्यास कार सेवा करून ती उद्ध्वस्त करू, असा इशाराच बजरंग दल, विश्व हिंदू परिषद यांनी दिला आहे. याच मागणीसाठी सोमवारी नागपुरात एका गटाने निदर्शन केले. त्याविरोधात धार्मिक मजकुराची प्रत जाळल्याचा आरोप करीत दुसरा गटही आक्रमक झाल्याने धुमश्चक्री झाली. मात्र, या धुमश्चक्रीत भरडले गेले ते सर्वसामान्य नागरिक. नागरिकांबरोबरच पोलिसांनाही टार्गेट केल्याने ३० ते ४० पोलीस जखमी झाल्याचे सांगितले जाते. वास्तविक, पोलीस प्रशासन हे दोन समाजातील तेढ मिटविण्याच्या प्रयत्नात होते. असे असतानाही पोलिसांवर हल्ला केला गेला, हे काही चांगले लक्षण मानता येणार नाही. हे बघता फडणवीस यांनी हल्लेखोरांवर कडक कारवाई करण्याचा दिलेला इशारा रास्तच. किंबहुना, पुढच्या काही दिवसांत नागपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्यावर सरकारला लक्ष केंद्रित करावे लागेल.

महाराष्ट्राने यापूर्वीही जातीय, धार्मिक संघर्षांचे परिणाम भोगले आहेत. तथापि, अशा संघर्षांतून कुठल्याही समाजाचे कधी भले होत नाही. उलट यात पिसले जातात, ते दोन्ही बाजूकडील निष्पाप नागरिक. हे बघता दोन समाजातील उसवू पाहणारी वीण पुन्हा कशी प्रस्थापित होईल, यासाठी प्रयत्न करावे लागतील. राहिला औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा. सरकारमधील घटक औरंगजेबाची कबर काढण्याच्या मुद्द्यावर सहमत दिसतात. औरंगजेबाची कबर हा कलंक आहे. तो पुसला पाहिजे, ही लोकभावना असल्याचे मतप्रदर्शन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे करतात. मात्र, शिवसेनेचेच नेते व केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या औरंगजेबाला गाडले म्हणून थडगे असावे. पण, उदात्तीकरण नको, या विधानाचा विचार करता सेनेत दोन मतप्रवाह दिसतात. तर औरंगजेबाचे उदात्तीकरण सहन करणार नाही. असा प्रयत्न खपवून घेणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात. तथापि, अजितदादांच्या राष्ट्रवादीने याबाबत काहीसा सावध पवित्रा घेतला आहे. महंत रामगिरी महाराज यांनीदेखील ही कबर एकदाची काढून टाका. ज्यांनी नागपुरात गोंधळ घातला, ते औरंगजेबाच्या विचारांचे आहेत, अशी प्रतिक्रिया दिली आहे. परंतु, दुसऱ्या बाजूला काही संघटना व पक्षांनी वेगळी भूमिका घेतल्याचे दिसते. औरंगजेबाला आपण महाराष्ट्राच्या मातीत गाडले. त्याचे प्रतीक म्हणजे खुल्ताबादची कबर आहे. म्हणूनच मराठ्यांच्या शौर्याची ही निशाणी तशीच ठेवा, अशी भूमिका ठाकरेंची सेना मांडताना दिसते. तर शरद पवार गटाने इतिहासकारांनीच विचारविनिमय करून कबरीचा विषय निकाली लावावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

तसे पाहिल्यास औरंगजेबाच्या कबरीचा समावेश संरक्षित स्मारकात असून, ही कबर पुरातत्त्व विभागाच्या ताब्यात आहे. त्यामुळे हा केंद्र सरकारच्या अखत्यारीतील विषय मानला जातो. हे सगळे लक्षात घेतले, तर औरंगजेबाची कबर काढायची झाली, तर अनेक तांत्रिक मुद्दे आधी निकालात काढावे लागतील. या विषयावरील मतमतांतराचा विचार करता याबाबत तज्ज्ञ इतिहासकारांची एखादी समितीच नेमणे योग्य ठरेल. ही समिती काय निष्कर्ष देते आणि त्यातून पुढे काय दिशा घ्यावी, याबाबत सरकारला मार्ग सापडू शकतो. महाराष्ट्राची संस्कृती ही सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात तर अनेक जाती, धर्मांचे लोक असल्याचे इतिहास सांगतो. याचा विचार करता महाराष्ट्रातील सामाजिक ऐक्य टिकविणे, ही सरकारबरोबरच सर्वच नागरिकांची जबाबदारी आहे. तथापि, या सलोख्यामध्ये कुणी विषाची पेरणी करीत असेल, तर अशांना कायद्याचा दणका द्यावाच लागेल.

# रामराज्यात श्रीराम देवस्थानाची जमीन सुरक्षित नाही

## मौजे चकलांबा ग्रामपंचायतीच्या अतिक्रमणाचा प्रश्न आ.विजयसिंह पंडित यांनी सभागृहात मांडला

**मुंबई । प्रतिनिधी**

**अतिक्रमण दूर करण्याचे काम ग्रामपंचायत करते मात्र चकलांबा ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान मालकीच्या जमीनीवर अतिक्रमण करून कचरा डेपोचे काम सुरु केले आहे. महायुतीच्या काळात 'रामराज्य' सुरु असल्याचे लोक सांगतात मात्र या रामराज्यात श्रीराम देवस्थानाची जमीन सुरक्षित नाही अशी खंत आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत व्यक्त केली. गेवराई तालुक्यात सुरु असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामांची चौकशी करण्यासाठी एसआयटी नेमण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्यांवरील चर्चेत सहभागी होताना आ.विजयसिंह पंडित विधानसभेत बोलत होते.**



जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेतील गैरव्यवहार आणि चकलांबा ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान मालकीच्या जमीनीवर केलेले कचरा डेपोचे अतिक्रमण या दोन विषयाला आ. विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत वाचा फोडली. यावेळी बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, जलजीवन मिशन अंतर्गत गेवराई तालुक्यातील १९२ गावांसाठी १७२ कोटी रुपये किंमतीच्या १७७ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे मंजुर आहेत. विहित मुदतीत एकाही योजनेचे काम पूर्ण झालेले नाही. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु होत आहेत. १९२ गावांपैकी १०% गावात सुध्दा सुरळीत पाणीपुरवठा होत नाही. वॅपकॉस प्रा. लि. सारख्या तांत्रिक सेवा पुरवठादार कंपनी आणि संबंधित विभागातील अधिकारी यांच्या संगणमताने शासनाचा कोट्यावधी रुपयांचा निधी अक्षरशः वाया गेला आहे. प्रगती कन्स्ट्रक्शन सारख्या कंत्राटदाराने कोट्यावधी रुपयांची देयके उचलून पोबारा केला आहे. त्यामुळे या सर्व योजनांच्या कामाची चौकशी करण्यासाठी एसआयटी गठीत करण्याची मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी केली. मौजे चकलांबा ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान मालकीच्या जमीनीवर केलेल्या



अतिक्रमणाबाबत बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, घनकचरा व्यवस्थापनासाठी चकलांबा ग्रामपंचायतीला निधी मंजुर झाला. मात्र या ग्रामपंचायतीने श्रीराम देवस्थान या नोंदणीकृत ट्रस्ट मालकीच्या गट क्र.५७१ मधील जमीनीवर कचरा डेपोचे काम सुरु केले आहे. या ग्रामपंचायतीचा कारभार याच सरकारमधील क्लास वन अधिकारी हाकत आहेत. 'अधिकारी-अधिकारी' अशी मिलीभगत सुरु असल्यामुळे आता श्रीराम सुध्दा चकलांबा सारख्या गावात सुरक्षित नाहीत. महायुतीच्या काळात रामराज्य सुरु असल्याचे काही लोक सांगतात मात्र याच सरकारच्या काळात श्रीराम देवस्थानाची जमीन आपण वाचवू शकतो का ? असा सवालही आ. विजयसिंह पंडित यांनी उपस्थित केला. चकलांबा ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती खेडकर यांच्या कार्यकाळात श्रीराम देवस्थानाच्या जमीनीवर अतिक्रमण होत असल्याची तक्रार पवन लाहोटी यांनी केली होती. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक राजेंद्र मोराळे यांनी हे काम स्थगित करण्याऐवजी देवस्थानच्या जागेत अतिक्रमण आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना गटविकास अधिकारी यांना लेखी पत्राद्वारे केल्या आहेत. कागदी घोडे नाचवून प्रकल्प संचालक राजेंद्र मोराळे हे चकलांबा ग्रामपंचायतीच्या सरपंच खेडकर यांना पाठिशी घालत आहेत का ? असा सवाल चकलांबा ग्रामस्थ विचारत आहेत.

# जमीनीचे प्रकरण न्याय प्रविष्ट असताना सिमेंट रस्त्याच्या कामाला सुरुवात

## काम बंद करा,शेतकऱ्यांची मागणी



**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील फुलेपिंपळगाव शिवारातील गट नंबर २० मधील गायरान जमीनी लगत केसापुरी गावाची शिव गेलेली आहे. ती केसापुरी शिवारातील प्लॉटिंग धारकांनी बळकावली आणि गायरान जमीनी पडीक असल्याचा गैरफायदा घेऊन रातोरात कच्चा रस्ता त्यातुनच तयार केला. यामुळे गटातील शेतकऱ्यांच्या जमीनी कमी भरत असल्याने गायरान धारकांनी माजलगाव न्यायालयात दावा दाखल करून जमीनीची मोजणी व ताबा देण्याची मागणी केली होती. श्रीधर साळवे विरुध बीड या दाव्यात न्यायालयाने कोर्ट कमीशनची नेमणुक केली, मोजणी केल्या नंतर १एकर जमीन शिवरस्त्यात गेल्याचे निष्पण झाले होते. सदर माहिती जिल्हा अधिकारी, तहसिलदार, उप अधीक्षक भुमी अभिलेख यांना आहे तर सदरील प्रकरण न्याय प्रविष्ट असताना देखील डॉ.शरद पवार, डॉ.अर्चना पवार यांनी शासना कडुन त्या जागेतुन जाणाऱ्या रस्त्याला मंजुर मिळवून राष्ट्रीय महामार्ग -६१ वरील ते फुलपिंपळगाव शिवारातील त्यांच्या ईगलवुड इंग्लिश स्कूलच्या बसेस ये-जा करण्यासाठी २कि.मी.सिमेंट रस्त्याच्या कामाला १३ मार्च रोजी सुरुवात केली. यासाठी त्यांनी फुलपिंपळगावचे सरपंच राहुल फुलगे,उपसरपंच शोहेल पठाण, सदस्य रवि शिंदे, गंगाराम वजीर, लहु कोरडे,हेमंत गोरे सह इतर व्यक्तींना हाताशी धरून सिमेंट रस्त्याचे उद्घाटन केले. त्यानंतर डॉ.पवार यांनी गुंड प्रवृत्तिच्या लोकांना बोलावुन रुंदी,खोली करण गायरान जमीनीतून सुरु करून जमीनीवर बेकायदेशीर रित्या ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. सदरील रस्त्याचा मावेजा गायरान धारक शेतकऱ्यांना काम सुरु करु नये अन्यथा काम बंद पाडण्यात येईल अशा इशारा वरील निवेदनाद्वारे तहसिलदार माजलगाव, उपअभियंता ,जि.प.बांधकाम उपविभाग, माजलगाव, पोनि.शहर पोलीस ठाणे,माजलगाव यांना दिला आहे . या निवेदनावर मनोज साळवे, तात्यासाहेब सुखदेव साळवे, प्रकाश साळवे,शिवाजी साळवे आदी गायरान धारकांच्या सह्या आहेत.

# १० वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार ?

**अंबड । पतिनिधी**

**अंबड शहरामध्ये काही दिवसापूर्वी दहा वर्षे मुलीवर लैंगिक अत्याचार ची घटना घडली असून याप्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक करून त्याला न्यायालय मध्ये हजर केले सध्या आरोपी पी सी आर मध्ये आहे.**

फिर्यादी महिला वय ४० वर्ष, रा. महाकाळा ता. अंबड आरोपी , वय ५९ वर्ष रा. लातुर ता.जि. लातुर, ह.मु. अंबड, दिनांक ०४/०२/२०२५ चे पुर्वी वेळ नक्की नाही, अंबड येथील एका किरायचे राममध्ये राहत होते.पिडीत नामे मुलगी वय १० वर्ष, रा. महाकाळा ता. अंबड ह.मु.रा. गॅस एजन्सी अंबड इथे घटना गुन्हा दाखल दि १७/०३/२०२५ रोजी पुढील तपास सुरू आहे. श्री. खांबे मा. परि.भा.पो.से. श्री. बारवाल , यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि ढाकणे, पोउपनि/बागलाने, मी तपास करीत आहे. या घटनेमधील यातील फिर्यादी व आरोपी यानी हार घालुन लग्न केलेले असुन आरोपी हा फिर्यादी सोबत नवरा म्हणून फिर्यादीच्या मुलींसह एकत्र राहत आहे. फिर्यादीची १० वर्षाची मुलगी दि. ०४/०२/२०२५ रोजीचे पुर्वी चार वेळा फिर्यादीच्या पिडीत मुलीवर यातील आरोपीने किरायचे राहते घरी बळजबरीने लैंगीक अत्याचार केले असुन आरडा ओरडा केला तर तुला, तुझ्या बहीणीला व आईला जीवे मारुन टाकीन अशी धमकी दिली आहे. म्हणुन दखलपात्र गुन्हा दाखल करुन पुढील तपासकामी मा. परि भा. पो. से श्री बारवाल सो याचे आदेशाने श्री विशाल कृष्णा खांबे यांच्याकडे दिला आहे.

# लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल, पाटोदा येथे माता-पालक मेळाव्याचा उत्साहपूर्ण वातारणात संपन्न



**पाटोदा । प्रतिनिधी**

**शहरातील प्रसिद्ध लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल मध्ये बुधवार दिनांक १९.मार्च २०२५ रोजी भव्य माता-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला पालकांचा मोठा प्रतिसाद लाभला होता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध चर्चासत्रे आणि मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली.**

मेळाव्याची सुरुवात, कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी श्रीमती अंजली गोरे मॅडम, सीमा वालेवाडीकर मॅडम, प्राचार्य पठाण सर , शालेय पर्यवेक्षिका सीमा माळी मॅडम यांनी दीपप्रज्वलनाने केली, प्रमुख अतिथी म्हणून अंजली गोरे मॅडम, सीमा वालेवाडीकर, मुख्याध्यापक पठाण सर उज्वला मॅडम, वसुंधरा मॅडम, पालक आणि शिक्षणतज्ज्ञ मान्यवर, पालक प्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापकांनी पालकांचे स्वागत करत शाळेच्या प्रगतीविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच व्यक्तिमत्त्व विकासासाठी शाळा कोणत्या योजना राबवत आहे, याविषयी पालकांना माहिती देण्यात आली. मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, मानसिक आणि नैतिक विकासावर भर देण्याच्या दृष्टीने अनेक उपयुक्त सत्रे घेण्यात आली. शिक्षणतज्ज्ञांनी आधुनिक शिक्षणपद्धती, तंत्रज्ञानाचा वापर, तसेच विद्यार्थी व पालक यांच्यातील संवाद महत्त्वाचा कसा आहे, यावर मार्गदर्शन केले. पालकांनी आपल्या मुलांच्या भविष्यासाठी शाळेच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. पालक आणि शिक्षकांमध्ये उत्स्फूर्त संवाद साधण्यात आला, जिथे पालकांनी आपले प्रश्न विचारले आणि शिक्षकांनी त्यांची उत्तरे दिली. काही पालकांनी आपल्या अनुभवांची माहिती दिली आणि शाळेच्या उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देखील विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. गीत, नृत्य, नाटिका आणि वक्तृत्व स्पर्धांमधून त्यांनी आपली कला सादर केली, ज्यामुळे संपूर्ण शालेय परिसर आनंदमय वातावरणाने भरून गेले होते, यावेळी शाळेतील मुलांनी आपली मनोगते व्यक्त केली आणि चिमुकल्यांनी बहारदार गीतावर नृत्य सादर केली. मेळाव्याच्या शेवटी प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शनपर भाषण केले आणि सर्व पालकांना आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी सातत्याने प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. पालक आणि शिक्षकांच्या सहकार्यातूनच विद्यार्थ्यांचा समग्र विकास होऊ शकतो, असा सकारात्मक संदेश या मेळाव्यातून देण्यात आला. शेवटी शाळेच्या व्यवस्थापनाच्या वतीने उपस्थितांचे आभार मानण्यात आले. उपस्थितांनी हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी आणि माहितीपूर्ण असल्याचे सांगितले. या उत्साहवर्धक माता-पालक मेळाव्यामुळे पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील बंध अधिक दृढ झाला आहे, असे मत सर्वांनी व्यक्त केले.

## पान १ वरून...

### ३१ मार्चपूर्वीच जमा होणार

खरीप हंगामात शेतकऱ्यांना अतिवृष्टी आणि पुराचा मोठा फटका बसला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांना मोठा फटका बसला. शेतकऱ्यांनी नुकसानीच्या सूचना कंपन्यांना दिल्या. काही भागात पंचनामे करण्यात आले. परंतु शेतकऱ्यांना अद्यापही खरीप २०२४ चा पीक विमा मिळाला नाही. राज्य सरकार आणि पीक विम्या कंपन्या शेतकऱ्यांना वेठीस धरत असल्याचा आरोप शेतकरी नेते करत आहेत.

------------------

### बीड पोलिस ॲक्शन मोडवर;

त्यानुसार दि. १० मार्च रोजी पोलिस अधिक्षकांना हा प्रस्ताव देण्यात आला. त्यानंतर हा प्रस्ताव विशेष पोलिस महानिरीक्षक यांना पाठवण्यात आला. दि. १९ मार्च रोजी विशेष पोलिस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी त्यावर स्वाक्षरी केली. त्यामुळे भोसले टोळीतील ९ जणांविरोधात मकोका लावण्यात आला असून यात दिपक भोसले (वय ३५, रा. वाहिरा), सोमीनाथ उर्फ नाज्या काळे (वय ३५, रा. घु. पिंपरी), मुद्दसर मन्सुर पठाण (वय ३८, रा. कानडी खुर्द), सोनी उर्फ अनिता गोरख भोसले (वय ४०, रा. वाहिरा), शशिकला दिपक भोसले (वय ३५, रा. वाहिरा), संध्या कोहीनुर भोसले (वय २१, रा. वाहिरा) यांना अटक केली असून तीन फरार आहेत. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी बाळकृष्ण हनपुडे हे करीत आहेत. भोसले टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आल्यावर पोलिस अधिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सिरसाळा येथील विशाल लक्ष्मण आरगडे याच्याविरोधात एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्याच्याविरोधात आतापर्यंत वेगवेगळ्या स्वरुपाचे ९ गुन्हे दाखल असून त्याच्यावर यापुर्वी सुध्दा प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र त्याने पुढे गुन्हे करणे सुरुच ठेवल्याने दि. १८ मार्च रोजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी विशाल आरगडे याच्याविरोधात एमपीडीए अंतर्गत कारवाई केली. त्यामुळे त्यास त्याच दिवशी बीड शहरात अटक करुन सिरसाळा पोलिसांच्या ताब्यात दिले. सिरसाळा पोलिसांनी चोख बंदोबस्तात विशाल आरगडे याची दि. १९ मार्च रोजी संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात रवानगी केली. ही कारवाई पोलिस अधिक्षक नवणीत काँवत, अप्पर पोलिस अधिक्षक चेतना तिडके, माजलगाव उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोनि शेख उस्मान, सिरसाळा ठाण्याचे सपोनि गोरखनाथ दहिफळे, युवराज चव्हाण, बळीराम राठोड, सपोउपनि अभिमन्यु औताडे, निलेश ठाकुर, गणेश हंगे, बिभीषण चव्हाण यांनी केली आहे.

-------------

### तीन दरोड्याचा लावला छडा;

काळे (वय ५५, रा. टाकळी मानूर), बाबासाहेब उर्फ चौऱ्या चंद्रभान चव्हाण (वय ३०, रा. टाकळी मानूर, ता. पाथर्डी) या चौघांना अटक केले. तर आणखी तीन आरोपी निष्पन्न झाले असून ते फरार आहेत. या काळे टोळीने २०२५ मध्येच चकलांबा पोलिस ठाण्याच्या हद्दीत दोन तर शिरुर कासार पोलिस ठाण्याच्या हद्दीत एक गुन्हा केला असल्याचे उघड झाले असून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, श्रीराम खटावकर, तुळशीराम जगताप, मनोज वाघ, कैलास ठोंबरे, अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, राहुल शिंदे, दिपक खांडेकर, बाळू सानप, विकास वाघमारे, अश्विनकुमार सुरवसे, आलीम शेख, सुनिल राठोड, सिध्देश्वर मांजरे यांनी केली.

----------------

### संतोष देशमुख हत्येचा खटला

आ.धनंजय मुंडे यांच्या जवळचा आहे. त्यामुळे या प्रकरणाला राजकीय वळण लागले आहे. वाल्मिक कराड आरोपी ठरल्यानंतर धनंजय मुंडे यांना आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा देखील द्यावा लागला. आता हे प्रकरण न्यायालयात वर्ग असून त्यावर सुनावणी सुरू आहे. या प्रकरणाची पहिली सुनावणी ही केज न्यायालयात झाली असून हा खटला बीड न्यायालयात चालवण्याची मागणी होत होती. यावर जिल्हा सत्र न्यायालयात सुनावणी होऊन हा खटला यापुढे बीड न्यायालयात चालवण्यात येणार आहे.

------------

### खोक्या भोसलेच्या विरोधात आजपासून

खोक्याने तीन व्यक्तींना मारहाण करण्याचे दोन वेगवेगळे व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल झाले होते. त्यानंतर खोक्यावर पोलिसासह वनविभागातर्फे गुन्हे दाखल करण्यात आले. सतीश उर्फ खोक्या भोसले याने २०० हरण मारल्याचा आरोप केला आहे. खोक्याचे सीडीआर तपासून त्याच्या आकावरही कारवाई करण्यासह खोक्यावर मकोका लावण्याची मागणी होत आहे. खोक्याचे शिश महल वनविभागाने जमीनदोस्त केले. खोक्याचा सीडीआर तपासून त्याला मकोका लावण्यात यावा, तसेच त्याच्या आकाला सहआरोपी करण्याच्या मागणीसाठी बीडचे वन्यप्रेमी मुंबई येथील आझाद मैदानावर दि. २० मार्चपासून उपोषणास बसणार आहेत. बीडवरून वन्यजीव प्रेमी मुंबईकडे रवाना झाले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात खोक्यासह त्याच्या आकाच्या अडचणी वाढणार आहेत.

--------

### नागपूरातील हिंसक प्रकरणानंतर

५०० हून अधिक ऑनलाइन पोस्ट हटवण्यात आल्या आहेत, असे त्यांनी सांगितले. जिल्हा मुख्यालयापासून सुमारे २५ किमी अंतरावर असलेल्या खुलताबाद शहरात औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसाठी राज्यभर निदर्शने करण्यात आली आणि अनेक राजकारण्यांनीही या आवाहनाला पाठिंबा दिला आहे. जिल्हा प्रशासनाने हा परिसर ''नो ड्रोन'' झोन म्हणून घोषित केला आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी राज्यात राज्य राखीव पोलिस दलाची एक कंपनी आणि ५० इतर कर्मचारी तैनात करण्यात आले आल्याचेही यावेळी सांगितले.

-----------

### नेत्यांच्या लाडक्या शिक्षकांना

व गटशिक्षणाधिकारी यांना दिले आहेत. मुळ पदस्थापनेवर शिक्षक हजर न राहील्यास कारवाईचा इशारा सुध्दा देण्यात आला आहे. प्रतिनियुक्तीवर वर्षानुवर्षे एकाच जागेवर चिकटून बसलेल्या नेत्यांच्या लाडक्या शिक्षकांना सिईओंचा हा मोठा दणका मानला जात आहे. बीड जिल्ह्यात ११ तहसिल, ११ पंचायत समिती आणि ११ गटशिक्षणाधिकारी कार्यालय असून यात अंदाजे ५० ते ५५ शिक्षक हे गेल्या बऱ्याच वर्षापासून नेत्यांच्या आशिर्वादाने प्रतिनियुक्तीवर होते. काम करण्यापेक्षा यातील बहुतांश शिक्षक हे नेत्यांची हुजरेगिरी करण्यात धन्यता मानत असल्याचे बोलले जात आहे. तर काही शिक्षक हे नेतेगिरी करून आपले बस्तान त्या त्या कार्यालयात मांडून होते. मार्चच्या पहिल्या आठवड्यात विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त हे बीड जिल्हा दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी जिल्हा परिषदेत आढावा घेतल्यावर त्यांच्या ही बाब लक्षात आली. त्यानंतर जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवणे यांनी दि. १८ मार्च रोजी एक आदेश काढून तहसिल, पंचायत समिती आणि गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील सर्व प्रतिनियुक्त्या रद्द केल्या. त्यामुळे नेत्यांच्या जीवावर या तीन कार्यालयात प्रत्येक तालुक्यात बस्तान मांडून बसलेल्या शिक्षकांना हा चांगलाच दणका आहे. सदर शिक्षकास कार्यमुक्त केले बाबतची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयास देण्यात यावी, यानंतर हे शिक्षक आपल्या कार्यालयात प्रतिनियुक्तिवर असल्यास अथवा प्रतिनियुक्तीच्या ठिकाणाहून त्यांच्या मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी हजार न झाल्यास विद्यार्थ्यांचे होणाऱ्या शैक्षणिक नुकसानास आपण स्वतः जबाबदार राहाल अशा सूचना जिल्ह्यातील सर्व तहसीलदार तथा निवडणूक अधिकारी गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांना पत्र क्रमांक जि. प .बी. /शिवी प्रा/ १३अ भाग-१ कावी/ २०२५ य क्र १३२९ दिनांक १८ मार्च २०२५ चे आदेशान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवणे यांनी दिली आहे.

------------

### जिलेटीनच्या स्फोटात

कामकाज सुरू असतांना सकाळी ११.३० च्या सुमारास विहीरीतील जिलेटींगचा स्पोट झाल्याने धनराज अनंत दहीफळे रा. खोडवा सावरगांव, ता. परळी या मजुराला विहीरीच्या बाहेर १० फुट उंच उडून परत विहीरीत पडल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाला तर पिंटू विठ्ठल दहीफळे, जीवन हरिश्चंद्र दहीफळे हे गंभीररित्या जखमी झाले असून त्यांना स्वा.रा.ती. रूग्णालयात उपचारासाठी आनले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना लातूरच्या खाजगी रूग्णालयात रेफर करण्याची विनंती केली तर दुसरा भारत तुकाराम पवार रा. तळेगांव हा देखील जखमी झाला असून त्याच्यावर स्वा.रा.ती. रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या स्फोटाची माहिती तालुक्यात वाऱ्यासारखी पसरल्यानंतर प्रशासनासह लोकप्रतिनिधी देखील घटनास्थळी धाव घेतली. या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

**घटना स्थळावर अतिरिक्त पोलीस अधिक्षकांची भेट**

या घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधिक्षक चेतना तिडके, पोलीस उपअधिक्षक चोरमले, बर्दापूर पोलीस ठाण्याचे ए.पी.आय. राजकुमार ससाने, बिट अमलदार चेवले यांनी घटनास्थळाला भेट घेवून जखमींना तात्काळ रूग्णालयात हलविले. उत्तम आडे यांच्या वैयक्तीक विहीरीच्या खोदकामाचे काम खोडवा सावरगांव येथील हरिश्चंद्र दहीफळे व गोविंद दहीफळे यांच्या ब्लास्टींगच्या ट्रॅक्टरला काम देण्यात आले होते. हे काम करत असतांना सदरील अपघात घडल्याचे प्रत्यक्षदर्शनिनी सांगीतले.

cmyk

## उमेदतर्फे गुढीपाडवा महोत्सव, ईद बाजार व खाद्य जत्रा स्वयंसहायता बचत गटांचे जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन

**२० ते २४ मार्च २०२५ दरम्यान**

**बीड । प्रतिनिधी**

ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्यावतीने उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान दिनांक २० मार्च २०२५ ते २४ मार्च २०२५ या कालावधीत वेळ सकाळी १० ते रात्री ११ वाजेपर्यंत उत्सव स्वयंसहायता समूहातील महिलांच्या प्रगतीचा, उत्सव महा खरेदीचा उत्सव, महा मेजवानीचा, गुढीपाडवा महोत्सव ईद बाजार व खाद्य जत्रा आणि जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन २०२५ जिल्हा परिषद बीड येथे आयोजित करण्यात आलेले आहे.

खास आकर्षण मसाले, खाद्यपदार्थ, हस्तकला, ग्रामीण कलाकुसर, ज्वेलरी तसेच शाकाहारी व मांसाहारी मेजवानी व खुप काही आयोजित करण्यात आलेले असून प्रवेश विनामुल्य आहे. तरी सर्व जनतेने याचा लाभ घेऊन एकवेळ अवश्य भेट द्यावी असे आवाहन डी आर डी ए च्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांनी केले आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. २० मार्च २०२५



# आझाद क्रांती सेनेच्यावतीने गायरानधारक संवाद परिषद

***आंबेडकरी चळवळीचा रथ पुढे नेहू-सिद्धार्थ शिंगारे *गायरान जमिनीवरचा ताबा सोडू नका-कडूदास कांबळे**

**वडवणी । प्रतिनिधी**

अनेक वर्षापासून महाराष्ट्रातील गायरान जमीनीचा लढा सुरू आहे जमीन मिळत नाही त्या जमिनीचा सातबारा मिळत नाही ती जमीन गायरानधारकांना अजूनही देण्यात आली नाही यासाठी सरकारने गायरान धारकांना जमीन देण्यात यावी त्याचा सातबारा त्यांच्या नावे करण्यात यावा यासाठी आझाद क्रांती सेनेच्या वतीने आज दिनांक १९/०३/२०२५ रोजी वडवणी शहरातील बचत गट भवन येथे गायरान भारत संवाद परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला विशेष उपस्थिती कडुदास कांबळे आझाद क्रांती सेनेचे महासचिव, सिद्धार्थ शिंगारे आंबेडकरी चळवळीचे अभ्यास, बजरंग ताटे मराठवाडा गायरान वहीतीधारक जनसंसद, अप्पाराव मोरताटे गायरान मोर्चा, नागनाथ चव्हाण वंचित हक्क आंदोलन, बाबुराव गालफाडे बहुजन अधिकारांदोलन, माया शिंदे श्रमिक मानव अधिकार संघ, तसेच प्रमुख उपस्थिती अशोक ढगे तालुकाप्रमुख माजलगाव आझाद क्रांती सेना, महादेव उजगरे आरपीआय वडवणी तालुका अध्यक्ष, बाबासाहेब साळवे गौतम दादा भालेराव मित्र मंडळ, विलास कारके युवा नेते आझाद क्रांतीसेना, केरबा कसबे धारूर तालुका उपप्रमुख आझाद क्रांती सेना, सुभाष मोमीन तालुका उपप्रमुख बीड आझाद क्रांती सेना, बळीराम मस्के तालुकाप्रमुख आझाद क्रांती सेना धारूर, तर स्वागत उत्सुक महादेव आव्हाड तालुकाप्रमुख आझाद क्रांती सेना वडवणी, मंगेश शिंदे तालुका महासचिव आझाद क्रांती सेना, लक्ष्मण पाटोळे तालुका उपप्रमुख ऊसतोड मजूर आझाद क्रांती सेना, अंकुश आढागळे नेते आझाद क्रांती सेना, दत्ताभाऊ गायकवाड कवडगाव सर्कल प्रमुख, अरुण आव्हाड, लक्ष्मण आव्हाड, तुकाराम शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर नेते कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सर्व मान्यवरांनी अभिवादन केले. त्यानंतर प्रस्ताविक अशोक ढगे यांनी केले ते म्हणाले की, आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातून समाजाला न्याय मिळावा म्हणून आम्ही रात्रंदिवस काम करत आहोत. समाजातील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन या लढ्यामध्ये सहभागी व्हावे असे यावेळी आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर नागनाथ चव्हाण यांनी सविस्तर गायरान संदर्भात गायरनधारकांना मार्गदर्शन केले व त्यांच्यासोबत संवाद साधला. त्यानंतर उस्मानाबाद जिल्ह्यातील ढाण्या वाघ बजरंग भाऊ ताटे यांनी हा लढा फक्त गायन संदर्भात नसून आपल्या जीवनाचा लढा आहे तो यशस्वी करण्यासाठी आपल्या सर्वांना एकत्र येण्याची गरज आहे. मग तो कुठल्याही संघटनेचा असो या पक्षाचा मात्र लढा यशस्वी करण्यासाठी



सर्वांनी एकत्र यावं असे यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर राम लगाडे यांनीही गायरानधारकांसोबत संवाद साधला अनेक विविध विषयावर चर्चा केली व गायरानधारकांना वेळोवेळी

मार्गदर्शनाची गरज आहे. ते आपण सर्वांनी अंगीकारले पाहिजे. तसेच आंबेडकरी चळवळीचे अभ्यास सिद्धार्थ शिंगारे म्हणाले की, ज्या गोष्टी बाबासाहेबांनी सांगितल्या त्या अनेक गोष्टी आपणास करावयाचे राहिलेल्या आहेत त्या करण्यासाठी एकत्र येऊन लढा उभा करण्याची गरज आहे. तीन गोष्टी बाबासाहेबांनी सांगितलेल्या आहेत. त्यापैकी दोन गोष्टी झाल्या मात्र एक गोष्ट सांगितलेली राहिलेली आहे तीच चळवळ आपल्याला पुढे घेऊन जाण्यासाठी या गायरान धारकांना सोबत घेऊन लढण्याची गरज आहे. आज महाराष्ट्रामध्ये समाजावर मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याच्यार सुरू आहेत. आपले हक्क व आपले अधिकार आपल्याला मिळाले पाहिजेत यासाठी आपलं लक्ष ड्रायव्हट करण्यासाठी सरकारची रणनीती आहे. मात्र आपण हे ओळखून आपला लढा पुढे घेऊन गेले पाहिजे. यासाठी गायरान संवाद परिषद आहे. यावेळी अप्पाराव मोरताटे यांनीही स्पष्ट अशा शब्दात गायनधारकांसोबत संवाद साधलेला आहे. त्यानंतर कडुदास कांबळे यांनी गेवराई तालुक्यामध्ये शेकडो एकर गायरान जमीन आपल्या बांधवांना देण्यासाठी शासनाला भाग पाडले. आणि असेच काम यापुढेही बीड जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात सर्वजण मिळून करू त्यासाठी एकमेकांना एकमेकांची गरज लागणार आहे. असं त्यांनी यावेळी बोलतांना सांगितले. शेवटी अध्यक्ष स्थानावरून आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश भाऊ घोडे हे बोलतांना म्हणाले की, आझाद क्रांती सेनेची स्थापना करून सहा महिने होत आले मी एकही दिवस घरी बसलो नाही किंवा मला कसलीही झोप लागत नाही गायरान धारकावर होत असलेला अन्याय समाजावर होत असलेला अन्याय हा बगवत नाही यासाठी तुम्हा आम्हाला रस्त्यावर उतरण्याची गरज आहे. आणि त्यासाठी सरकारने गायरानधारकांच्या प्रश्नावर कधी विधानसभेत आवाज उठवला नाही किंवा कधी प्रश्नही उपस्थित केला नाही तो आपल्यालाच करावा लागेल आणि त्यासाठी सरकारला धारेवर धरण्याचे काम यापुढे आझाद क्रांती सेना करणार असल्याचे राजेश घोडे यांनी सांगितले. प्रत्येक गावागावातून आझाद क्रांती सेनेच्या बैठका झाल्या पाहिजेत त्या बैठकीमध्ये निर्णय झाले पाहिजेत या बैठकीच्या माध्यमातून न्याय मिळण्याच्या हेतूने उद्दिष्ट ठेवले पाहिजे एवढेच नव्हे येणाऱ्या काळामध्ये तुमच्या आमच्यासारखे पुढारी होणार नाहीत याचं कारण या सरकारची नियत खराब आहे आपल्यासारख्या कार्यकर्त्यांना रस्त्यावर बोलण्याची हक्क व अधिकार मागण्याची जरुरत ठेवणार नाहीत त्यासाठी आपण एकत्र येणे गरजेचे आहे. जर एकत्र आलोत तर नक्कीच या राज्यामध्ये एक नवी क्रांती घडवू शकतो यामध्ये दुमत नाही आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातून सर्वच संघटनांना सोबत घेऊन गायरान प्रश्न कसा मार्गी लागेल याबाबत आम्ही सर्व पुढारी याच्यावर विचारविनिमय करून आपल्या सर्वांना सोबत घेऊन हा लढा लढणार आहोत. यामध्ये कोणीही मागे राहू नका जो मागे राहील तो मागेच राहील. जो केंद्र सरकारकडून नवीन जीआर आलेला आहे त्या संदर्भातही पुरेपूर माहिती घेऊन त्याचा पाठपुरावा करावा लागणार आहे यासाठी आझाद क्रांती सेना व सर्व संघटनांनी रस्त्यावर उतरून सरकारला जॉब विचारण्याची गरज आहे. आणि ती वेळ आता येऊन ठेपलेली आहे. महिला मंडळ असेल किंवा विद्यार्थी असतील यांच्याही संदर्भात कायदा करण्याची गरज आहे जेणेकरून अन्याय अत्याचाराला ब्रेक लागेल हेच काम येणाऱ्या काळामध्ये आपणाला सर्व जणांना मिळून करायचे आहे त्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे. शेवटी आझाद क्रांती सेनेच्या महिला तालुकाप्रमुख म्हणून कांताबाई इचके यांची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी आझाद क्रांती सेनेचे सर्व तालुक्याचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बहारदार आवाजामध्ये तुकाराम शिंदे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार आझाद क्रांती सेनेचे वडवणी तालुका अध्यक्ष महादेव आवाड यांनी मानले.

# विस्तार अधिकाऱ्यावर चालतो तालुक्याचा कारभार!

**मिनियार साहेब मंठा पंचायत समितीला कायमस्वरूपी बिडिओ द्या; २१ पदे रिक्त, सावंत यांच्यासह अनेक कर्मचारी प्रतिनियुक्तीवर**

जालना । प्रतिनिधी

मंठा येथील लोकप्रतिनिधीला दिसत नसल्यामुळे मंठा पंचायत समितीमध्ये काय प्रकार चालू आहे. तालुक्यातील जनतेचे काम वेळेवर व्हायना. याचा बंदोबस्त करण्यासाठी जिल्हा परिषद चे नवीन रुजू झाल्याले मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिणियार येणे तत्काळ निर्णय घेऊन कायमस्वरूपी मंठा पंचायत समितीला गटविकास अधिकारी देण्यात यावो अशी मागणी सर्वसामान्य नागरिकाकडून करण्यात येत आहे. तालुक्यातील मंठा पंचायत समितीच्या नूतन वास्तू स्थापनेपासून अधिकारी, कर्मचाऱ्यांना रस्ता, पिण्याचे पाणी या मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. मागील अनेक वर्षापासून या पंचायत समितीला कायमस्वरूपी गटविकास अधिकारी मिळत नसल्यामुळे तालुक्यातील अनेक विकासाची कामे खोळंबली आहेत. अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी असलेली निवासस्थाने बांधकाम विभागाने पंचायत समितीकडे हस्तांतरित न केल्यामुळे करोडो रुपये खर्च करून बांधलेली निवासस्थाने भकास झाली आहेत. त्यामुळे बहुतांश कर्मचारी मुख्यालय न राहता बाहेर गावाहून अपडाऊन करतात. त्यांच्यावर प्रभारी गटविकास अधिकारी संतोष गगनबोने यांचा वचक नसल्याचे दिसून येते. मंठा पंचायत समितीमध्ये ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची एकूण ६९ पदे असून त्यापैकी १४ पदे रिक्त आहेत, वरिष्ठ सहाय्यकाचे एक पद, कनिष्ठ सहाय्यकाचे दोन पदे, कनिष्ठ अभियंत्याचे एक पद आणि शिपायाचे चार पदे अनेक वर्षापासून रिक्त आहेत. मंठा पंचायत समितीचे कृषी विस्तार अधिकारी डी आर सावंत मागील तीन-चार वर्षापासून ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र जालना येथे प्रतिनियुक्तीवर आहेत, त्यामुळे एकाच कृषी विस्तार अधिकार्यावर संपूर्ण तालुक्याचा भार आला आहे. तसेच एन डी पाडेवार हे जालना जिल्हा परिषदेमध्ये पाणीपुरवठा विभागात प्रतिनियुक्तीवर आहेत. कनिष्ठ अभियंता एस पी आघाव यांची परतुर पंचायत समिती येथे प्रतिनियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांना परतूरसह मंठाचाही कार्यभार सांभाळावा लागत असल्याचे दिसून येते. कनिष्ठ सहाय्यक एस डी गोमलाडू हे विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे प्रतिनियुक्तीवर आहेत. या सर्व प्रतिनियुक्त्या तात्काळ रद्द करून पंचायत समिती मधील रिक्त पदे तात्काळ भरण्याची मागणी करण्यात येत आहे.

कृषी विस्तार अधिकारी डी आर सावंत हे जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांची हुजरेगिरी करून मागील तीन-चार वर्षांपासून ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र जालना येथे प्रतिनियुक्तीवर आहेत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत अनुसूचित जाती जमातीतील शेतकऱ्यांना विहिरीचा लाभ देण्यात येतो, तसेच पीक कापणी तक्ते तयार करणे, जिल्हा परिषद उपकर अंतर्गत ५० टक्के सभोवतीवर शेतीसाठी लागणारे अवजारे शेतकऱ्यांना देणे, बिरसा मुंडा कृषी योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना राबविणे अशी अनेक कामांची जबाबदारी ृषी विस्तार अधिकार्यावर असते मात्र, डी आर सावंत यांची ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र जालना येथे प्रतिनियुक्ती असल्यामुळे एकाच कृषी विस्तार अधिकाऱ्यावर संपूर्ण कामाची जबाबदारी येऊन ठेपली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार यांनी प्रति नियुक्त्या रद्द कराव्यात अशी मागणी होत आहे.

## पान ६ वरून...

### अंबाजोगाई येथे लिंगायत

संघर्षातून आपले स्वतंत्र विश्व निर्माण करणाऱ्या रणरागिणींचा विशेष सन्मान करण्यात आला. या वेळी श्रीमती सुमनकाकू उमराणे श्रीमती लताताई रांजणकर श्रीमती शांताताई होळगे यांचा शाल, सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला:

कार्यक्रमाला सौ. शितल वांडरे (उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य लिंगायत हडगार कोष्टी समाज संस्था), सौ. सविताताई द्रुकर (अध्यक्ष, कोष्टी समाज अंबाजोगाई) आणि सौ. ज्योती सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती होती. बालसंगोपन या विषयावर सौ. ज्योती सुरवसे यांनी मार्गदर्शन केले. तसेच, ''सासूची जावाई असाच असावा असा अट्टाहास का?'' या महत्त्वपूर्ण विषयावर सौ. सुरेखा बालाजी सवने शिरूर अनंतपाळ यांनी चर्चा करण्यात आली.यावेळी समाजातील जेष्ठ महिलांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अश्विनी नंदिकोले यांनी केले, तर रूपाली आगलावे यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाला महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला.

### विलास भोगाडे यांच्यावर

झाल्यामुळे ते मोठ मोठयाने ओरडत होते. फिर्यादी यांची पत्नी फिर्यादी यांना दवाखान्यात नेण्यासाठी रिक्षा किंवा वाहन मिळते का हे पाहत असताना आरोपीने तिला रस्त्यावर मारहाण करुन माघारी लावले व त्याला दवाखान्यात नेऊ नका याला येथेच मरु दया असे मोठयाने ओरडुन सांगत होते. तसेच त्यावेळी आरोपी यांनी आम्ही यापुढे तुला व तुझया मालकाला जिवंत सोडणार नाही दोघालाही जिवेच मारुन टाकु अशी धमकी फिर्यादी यांना दिली व तेथुन निघुन गेले. त्यावेळी फिर्यादी यांना दुखापत झाल्यामुळे फिर्यादी हे जमीनीवर लोळत होते. त्यानंतर फिर्यादी यांच्या पत्नीने फिर्यादी यांचे मालकाला फोन करुन सांगितले असता फिर्यादी यांच्या मालाकाने बाबु वांढरे यांना जिप घेऊन तेथे पाठवुन दिले व त्यानंतर बाबु वांढरे यांनी फिर्यादी यांना आष्टी पोलीस ठाणे येथे नेले. तेथील पोलीसांनी फिर्यादी यांना उपचारासाठी सरकारी दवाखाना आष्टी येथे पत्र देऊन पाठवुन दिले. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी सदर रुग्णालयात उपचार घेतले व सदरील रुग्णालयातुन फिर्यादी यांना सरकारी दवाखाना बीड, येथे उपाचारासाठी दाखल होण्यास सांगितले. त्यामुळे फिर्यादी हे सरकारी दवाखाना बीड येथील वार्ड क्रं.५ मध्ये दाखल झाले. तेथे फिर्यादी यांना झालेल्या दुखापती बाबत सोनोग्राफी करण्यास सांगितले होते.सदरील रुग्णालयात उपचार घेत असताना पोलीसांनी त्यांचा घटनेबाबत दि.०५/०४/२०२१ रोजी जबाब नोंदुवण घेतला. त्यानुसार आष्टी पोलीस ठाणे येथे आरोपींचे विरुध्द गुन्हा नोंदणी क्रमांक १०४/२०२१ हा भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये दाखल करण्यांत आला.यावर आरोपींकडून बी.बी.अनारसे यांनी बाजू मांडून न्या.एम.के.पाटील यांनी आरोपी क्र. १ व २ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ च्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात आले असल्याचा निकाल दिला आहे.

### युसूफवडगांवच्या अमोल

व खवा भट्टी चालवुन आपल्याला मुलाला दर्जेदार व उच्च शिक्षण मिळण्यासाठी कष्ट करणारे त्याचे वडील दत्तात्रय जाधव हे सुध्दा तितकेच अभिनंदनास पात्र आहेत.त्याच्या या यशा बद्दल गावकऱ्यांना कडुन कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

# १०० रुपयांच्या मुद्रांक विक्रीबद्दलचा संभ्रम दूर करून विक्री सुरू करा!

**नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी राजेभाऊ फड यांचे प्रशासनाला निवेदन**

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

विविध शासकीय कामासाठी वापरण्यात येणारे १०० रुपयांचे मुद्रांक विक्रीच्या अनुषंगाने झालेल्या शासकीय आदेशाबाबत अद्याप नेमकी स्पष्टता आलेली दिसत नाही. १०० रुपयांच्या मुद्रांकाची विक्री शासनाने स्थगित केली असल्याचा शासन आदेश दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी काढण्यात आला आहे. असे असताना संबंधित मूल्याच्या मुद्रांकाची इतर काही जिल्ह्यांत विक्री अद्यापही चालू आहे. मात्र परळी वैजनाथ तालुक्यात १०० रुपयांचा मुद्रांक मिळत नाही. त्यामुळे याबाबत नागरिकांत मोठा संभ्रम निर्माण झाला असून गैरसोय टाळण्यासाठी प्रशासकीय पातळीवरून योग्य तो निर्णय घेऊन मुद्रांक विक्री सुरू करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.



परळी तालुक्यातील नागरिकांनी १०० रुपयांच्या मुद्रांकाविषयीच्या तक्रारी आणि शंका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्याकडे मांडल्या असता त्यांनी परळीचे दुय्यम निबंधक श्रेणी - १ यांना निवेदन सादर केले आहे. यात म्हटले आहे की, १०० रुपयांच्या मुद्रांकाची विक्री बंद करण्याचे शासनाने आदेश काढले आहेत. असे असतानाही राज्यातील अनेक जिल्ह्यात त्या मुद्रांकाची विक्री आजही सुरू आहे. काही जिल्ह्यात मुद्रांक विक्री सुरू ठेवून काही जिल्ह्यात ती बंद ठेवण्यात आल्याने मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. जर विक्री चालू असलेल्या जिल्ह्यात १०० रुपयांचे मुद्रांक वापरून शासकीय कामे होत असतील तर ते बीड जिल्ह्यात का होत नाहीत? परळीत सदरील मुद्रांक भेटत नसल्याने नागरिकांची अनेक शासकीय कामे खोळंबली आहेत. काही दिवसांपूर्वी जिल्हा प्रशासनाची बैठक झाल्यानंतर १०० रुपयांच्या मुद्रांकाची विक्री सुरू करू असे आश्वासन मुद्रांक विक्रेत्यांना मिळाले असल्याचे समजते. मात्र त्याबाबत काहीही निर्देश दिले गेले नाहीत. तरी आपण शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १०० रुपयांच्या मुद्रांकाची विक्री करण्याचे निर्देश द्यावेत अशी मागणी राजेभाऊ फड यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# जिल्हा महिला व बाल विकास विभागाने १३१ बालविवाह रोखले -कोमल कोरे

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात बालविवाह निर्मुलन कृती आराखडा प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. बालविवाह करणे हा कायद्याने गुन्हा आहे. जिल्हा महिला व बाल विकास विभागाने चालु वर्षात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्यातील एकुण १३१ बालविवाह रोखले आहेत. तसेच जानेवारीपासुन आजपर्यतच्या कालावधीत बालविवाहाच्या २ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कोमल कोरे (चाटे) यांनी दिली. तसेच यावेळी शहरा भागातील बालविवाह रोखण्यासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी यांची जबाबदारी असते तसेच ग्रामीण भागातील बालविवाह रोखण्यासाठी ग्रामसेवक हे जबाबदार असतात या दोघांनीही जबाबदारीने काम करावे.

बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ आणि महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध अधिनियम संपुर्ण जिल्ह्यात लागू करण्यात आलेला आहे. कायद्यान्वये विवाहासाठी मुलीचे वय १८ तर मुलाचे वय २१ वर्षे पुर्ण असणे बंधनकारक आहे. तसे नसल्यास विवाहास उपस्थित नातेवाईक, मंडपवाले, पुरोहित, आचारी हे कायद्यानूसार दंडात्मक कारवाईस पात्र ठरतात. अधिनियमानूसार दोन वर्षे कारावास व एक लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतुद आहे. प्रशासनाकडून बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून ग्रामीण भागासाठी ग्रामसेवक तर शहरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे बालविवाहाला प्रतिबंध घालण्यासाठी बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात जनजागृतीपर आणि प्रतिबंधात्मक विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे.ग्रामस्तरावर बालविवाह थांबविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या ग्रामस्तरीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना त्रास होत असल्यास त्यांना पोलिस संरक्षण तात्काळ पुरविण्यात येते. बालविवाह झाल्यास त्या बालिकेवर खेळण्या-बागडण्याच्या वयात कुटुंबाची जबाबदारी लादली जाते. यामुळे मुलीची शारिरीक व बौध्दीक वाढ परिपूर्ण होवू शकत नाही.गावात ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रे आदि ठिकाणी चाईल्डलाईनचा १०९८ हा हेल्पलाईन क्रमांक नमुद करण्यात आलेला आहे. तरी आपल्या गावात बालविवाह होत असल्यास जागरुक व्यक्तींनी चाईल्डलाईनच्या टोल फ्री १०९८ या क्रमांकावर माहिती कळवावी, यामध्ये आपले नाव गोपनीय ठेवण्यात येईल असा संदेश भिंतीवर जनजागृतीसाठी रंगीत स्वरुपात नमुद करण्यात आलेला आहे.

# शेतकऱ्यांप्रती सहवेदना व्यक्त करण्यासाठी शेतकरी सहवेदना दिवस

**लिंबागणेश। प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हि राष्ट्रीय आपत्ती असुन आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शेतकरी विरोधी सिलिंग, आवश्यक वस्तु, जमीन अधिग्रहण कायदे रद्द करण्यात यावेत या प्रमुख मागणीसह यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील साहेबराव करपे,मालतीताई करपे यांनी १९ मार्च १९८६ रोजी आर्थिक विवंचनेतुन आपल्या ४ लहान मुलांसह सामुहिक आत्महत्या केली होती.या सामुहिक आत्महत्येची शासन दरबारी पहिली शेतकरी आत्महत्या म्हणून नोंद झाली.या घटनेला यावर्षी ३९



वर्षे पूर्ण झाली आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड पोलिसांच्या माहितीनुसार देशभरात दररोज सुमारे ४५ शेतकरी आत्महत्या करतात. तर महाराष्ट्रात दररोज सुमारे १५ शेतकरी आत्महत्या करून मृत्युला कवटाळतात. बीड जिल्ह्यात २०१४ ते २०२४ या १० वर्षाच्या कालावधीत २४३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून जीवन संपवले आहे.

८ वर्षांपासून १९ मार्च २०१९ पासुन किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राज्यातील आणि देशातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी दरवर्षी १९ मार्च रोजी अन्नदात्यासाठी एक दिवस उपवास करून शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाविरोधात प्रभावी संदेश देण्यासाठी शेतकरी आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शेतकरी विरोधी कायदे रद्द रद्द करण्यात यावेत.प्रशासनाच्या निष्क्रियतेला जाब विचारण्यासाठी, शेतकऱ्यांचे हक्क व अस्तित्व वाचवण्यासाठी एल्गार करण्याच्या उद्देशाने संवेदनशील नागरीकांनी एक दिवसाचा कडकडीत उपवास करत आपल्या सहवेदनेचा, पाठिंब्याचा आणि आंदोलनाच्या जाज्वल्य हेतुचा जागर करण्यासाठी अमर हबीब यांच्या मार्गदर्शनाखाली वैयक्तिक उपवास, सामुहिक उपोषण, श्रद्धांजली सभा आदिंचे आयोजन करण्यात यावे असे आवाहन करण्यात आले असुन या आवाहनाला प्रतिसाद देत किसानपुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१९ बुधवार रोजी सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सामुहिकरीत्या एक दिवस अन्नत्याग आंदोलन करत आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी '' शेतकरी सहवेदना दिवस'' पाळण्यात आला. यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, महादेव कुदळे, अॅड.गणेश वाणी, भगवान मोरे, रामकिसन गिरे, पांडुरंग वाणी, रामचंद्र मुळे,आश्रुबा गिरे, राजेंद्र वायभट, साहेबराव निर्मळ , महादेव ढास, संतोष भोसले, संजय सुकाळे , पत्रकार हरीओम क्षीरसागर आदी सहभागी झाले होते.

cmyk

# सोयापेंड निर्यातीत २३ टक्क्यांची घट; सोयापेंडचा भावही झाला कमी

नवी दिल्ली : देशातून तेलबिया पेंडची निर्यात १२ टक्क्यांनी कमी झाली आहे. तर सोयापेंड निर्यातीतही मोठी घट झाली. चालू हंगामात ५ महिन्यांमध्ये सोयापेंड निर्यात २३ टक्क्यांनी कमी झाली. तसेच मागील महिन्याभरात सोयापेंडच्या भावातही घट झाली, असे एसईएने म्हटले आहे.

द सॉल्वेंट एक्सट्राक्टर्स असोसिएशन ऑफ इंडिया अर्थात एसईएने सोयापेंडची निर्यात चालू आर्थिक वर्षात एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या काळात १९ लाख ४० हजार टन झाली. मागच्या वर्षी याच ११ महिन्यांमध्ये १९ लाख ३४ हजार टन निर्यात झाली होती. म्हणजेच यंदाही गेल्यावर्षीच्या दरम्यान निर्यात झाली. भारताच्या सोयापेंडचे मुख्य ग्राहक जर्मनी आणि फ्रान्स हे दोन देश ठरले आहेत. युरोपियन देशांनी ११ महिन्यांमध्ये भारतातून जवळपास ६ लाख टन सोयापेंडची आयात केली आहे. मात्र ऑक्टोबरपासून सुरु झालेल्या हंगामात सोयापेंड निर्यात २३ टक्क्यांनी घटली आहे. तर चालू हंगामात केनिया भारताच्या सोयापेंडचा सर्वात मोठा आयातदार ठरला. केनियाने जवळपास दीड लाख



टन सोयापेंड भारताकडून खरेदी केली. एसईएच्या माहितीनुसार, देशातून होणारी तेलबिया पेंडेची निर्यात १२ टक्क्यांनी कमी झाली. चालू वर्षात ११ महिन्यांमध्ये देशातून ३९ लाख टन सोयापेंड निर्यात झाली. मागच्या वर्षी याच काळात जवळपास ४५ लाख टनांची निर्यात झाली होती. फेब्रुवारी महिन्यातही तेलबिया निर्यात कमी झाली आहे. मोहरी पेंडेला आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी कमी झाली आहे. चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत जवळपास १७ लाख टनांची निर्यात झाली. मात्र मागीलवर्षी याच काळातील निर्यात २० लाख ३९ हजार टन होती. आंतरराष्ट्रीय बाजारात सोयापेंडचे भाव कमी झाले आहे. वाढलेला सोयापेंडचा पुरवठा आणि कमी झालेली मागणी, याचा दरावर परिणाम दिसत आहे. त्यामुळे सोयापेंडचा भाव मागील महिन्यातील ३८० डॉलर प्रतिटनांवरून कमी होऊन सध्या ३६० डॉलर प्रतिटनांवर आला आहे. याचा परिणाम सोयाबीनच्या दरावरही होत आहे.

चालू हंगामातील सोयापेंड निर्यात घटली :

देशात सोयाबीनचा हंगाम ऑक्टोबर महिन्यापासून सुरु होतो. चालू आर्थिक वर्षात सोयापेंड निर्यात काहीशी वाढलेली दिसते. मात्र ऑक्टोबर महिन्यापासून सुरु झालेल्या चालू हंगामात निर्यात कमी झाली. ऑक्टोबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या ५ महिन्यांमध्ये देशातून १० लाख ३१ हजार टन सोयापेंड निर्यात झाली. मागील हंगामात याच ५ महिन्यांमध्ये तब्बल १३ लाख ४७ हजार टन सोयापेंडची निर्यात झाली होती. म्हणजेच यंदा सोयापेंड निर्यातीत तब्बल २३ टक्क्यांची घट झाली आहे, असेही एसईएने म्हटले आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६०२ : डच ईस्ट ईंडिया कंपनीची स्थापना
१७३९ : नादिरशहाने दिल्ली लुटली. मयूरासनासहित नवरत्ने लुटून इराणला पाठविली.
१८५४ : रिपब्लिकन पार्टी ऑफ अमेरिका या पक्षाची स्थापना झाली. या पक्षाला 'ग्रँड ओल्ड पार्टी' असेही म्हणण्यात येते.
१९०४ : चर्च ऑफ इंग्लंडचे पुजारी चार्ल्स फ्रीर अँड्र्यूज महात्मा गांधी यांच्या सोबत स्वातंत्रता आंदोलनामध्ये भाग घेण्यासाठी भारतात आले होते.
१९१६ : अल्बर्ट आइनस्टाइनने सापेक्षतावादाचा सिद्धांत प्रसिद्ध केला.
१९१७ : महाडचा चवदार तळे सत्याग्रह सुरु झाला.
१९२७ : डॉ. बाबासाहेब अंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली महाडच्या चवदार तळ्यावरील सत्याग्रह.
१९५६ : ट्युनिशियाला (फ्रान्सकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९६६ : लंडन येथील वेस्टमिनिस्टर च्या सेंट्रल मध्ये प्रदर्शनी करिता ठेवण्यात आलेल्या फुटबॉल वर्ल्ड कप ची चोरी करण्यात आली होती.
१९८२ : फ्रांसने परमाणु शास्त्राची चाचणी केली.
२०१५ : सूर्यग्रहण, रात्र व दिवस सारखा असण्याचा काळ, आणि चंद्र पृथ्वीच्या सगळ्यात जवळ येणे हे सर्व एकाच दिवशी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१५ : मुघल बादशाहा शहाजहा व पत्नी मुमताज महल यांचे सर्वात थोरले पुत्र दारा शिकोह यांचा जन्म.
१८२८ : हेन्रिक इब्सेन नॉर्वेजियन नाटककार, दिग्दर्शक आणि कवी (मृत्यू: २३ मे १९०६)
१९०८ : सर मायकेल रेडग्रेव्ह, ब्रिटिश अभिनेता (मृत्यू: २१ मार्च १९८५)
१९२० : वसंत कानेटकर, नाटककार.
१९२१ : भारतीय प्रशासकीय सेवेचे माजी अधिकारी पडिनजरेतकालकल चेरियन अलेक्झांडर यांचा जन्मदिन.
१९३९ : माजी भारतीय प्रथम श्रेणी क्रिकेट खेळाडू एच.एच. जामसाहेब शत्रुसूर्यासिंह जडेजा यांचा जन्म राजस्थान येथे झाला होता.
१९५१ : माजी भारतीय क्रिकेटपटू आणि भारतीय राष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षक मदनलाल उधौरम शर्मा यांचा जन्मदिन.
१९५२ : माजी भारतीय टेनिसपटू आणि व्यावसायिक आनंद अमृतराज यांचा जन्मदिन.
१९६६ : अलका याज्ञिक, पार्श्वगायिका
१९७३ : पहिले भारतीय खेळाडू अर्जुन अटवाल यांचा जन्मदिन.
१९८७ : कंगना राणावत, सिनेकलाकार

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५१ : लहरी सुलतान मुहम्मद बिन तुघलक.
१७२७ : सर आयझॅक न्यूटन इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ, गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ. गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत मांडला. गणितातील 'कॅल्क्युलस' या शाखेचे जनक (जन्म: २५ डिसेंबर १६४२)
१९२५ : लॉर्ड कर्झन ब्रिटिश मुत्सद्दी आणि भारताचे व्हॉइसराय (जन्म: ११ जानेवारी १८५९)
१९५६ : बा. सी. मर्ढेकर मराठी नवकाव्याचे प्रणेते (जन्म: १ डिसेंबर १९०९)
१९७० : माजी भारतीय हॉकी खेळाडू जयपालसिंग मुंडा यांचे निधन.
२०१४ : भारतीय पत्रकार आणि लेखक खुशवंत सिंग यांचे निधन. (जन्म: २ फेब्रुवारी १९१५)

# अशा प्रकारे करा विहीर पुनर्भरण

## मिळेल पाण्याचा शाश्वत स्त्रोत



शेतकरी मित्रांनो, पावसाळा सुरू होतो आहे. त्यामुळे विहिरी शेततलाव भरण्यासाठी हा चांगला काळ आहे मात्र पावसाचे वाहणारे पाणी सरळ विहिरीत सोडू नये. कारण वाहणाऱ्या पावसाच्या पाण्यात माती, गाळमिश्रण असते जर असे पाणी सरळ विहिरीत सोडले तर विहिरीत गाळ साठत जातो. यावर वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील अखिल भारतीय समन्वयित कोरडवाहू शेती संशोधन केंद्राने विहीर, कूपनलिका पुनर्भरणाचे तंत्र विकसित केले आहे. विहीर, कूपनलिका पुनर्भरणाच्या उपाययोजना केल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे शक्य होईल.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील कोरडवाहू शेती संशोधन केंद्राने विहीर पुनर्भरण तंत्रज्ञान विकसित केले आहे. यात दोन प्रकारच्या गाळण यंत्रणा आहेत. यामुळे पावसाच्या पाण्याबरोबर येणारा गाळ अडविला जातो. शुद्ध पाणी विहिरीत सोडले जाते. या सयंत्रात दोन प्रकारच्या गाळणी यंत्रणा आहेत. यामुळे पावसाच्या पाण्याबरोबर येणारा गाळ अडविला जातो. शुद्ध पाणी विहिरीत सोडले जाते. शेताच्या रचनेनुसार पावसाचे वाहते पाणी गाळण यंत्रणेकडे वळवावे.

१) पहिली पद्धत : शेतातील पाणी सरळ टाक्यात घेण्याऐवजी टाक्याबाहेर एक साधा खड्डा करून त्यात दगड, गोटे, रेती टाकावेत. त्यातून एका पीव्हीसी पाईपचे पाणी प्रथम प्राथमिक गाळण नियंत्रणेत घ्यावे. शेताकडे चारीद्वारा वाहणारे पाणी प्रथम प्राथमिक गाळण यंत्रणेत घ्यावे. मुख्य गाळण यंत्रणेच्या अलीकडे १.५ मीटर बाय १ मीटर आकाराची दुसरी टाकी बांधावी. त्याला प्राथमिक गाळण यंत्रणा असे म्हणतात. शेतातून वाहत येणारे पाणी प्रथम या टाकीत घ्यावे तेथे जड गाळ खाली बसून थोडे गढूळ पाणी पीव्हीसी पाईपच्या माध्यमातून किंवा खाचेद्वारे मुख्य गाळण यंत्रणेत सोडावे.

२) दुसरी पद्धत : विहीर पुनर्भरण मॉडेलच्या दुसऱ्या भागाला मुख्य गाळण यंत्रणा असे म्हणतात. ही यंत्रणा विहिरीपासून दोन ते तीन मीटर अंतरावर बांधावी.

यासाठी २ मीटर लांब, २ मीटर रुंद आणि २ मीटर खोल खड्डा करावा. याला आतून सिमेंट विटाचे बांधकाम करून टाकी सारखे बांधून घ्यावे.

यात मुख्य गाळण यंत्रणेच्या खालील भागातून चार इंच व्यासाचा पीव्हीसी पाईप विहिरीत सोडावा. या टाकीत ३० सेंटीमीटर उंचीपर्यंत मोठे दगड नंतर तीस सेंटीमीटर उंचीपर्यंत छोटे दगड व त्यानंतर तीस सेंटीमीटर जाडीचा वाळूचा थर टाकावा. असे ९० सेंटीमीटर जाडीचे गाळण थर असावे. त्यावरील ६० सेंमी भागात पाणी साठते. या काळात यंत्रने मार्फत पाणी गाळले जाऊन विहिरीत जाते.

पाण्याचा शाश्वत स्त्रोत : साधारणतः दोन एकर क्षेत्रातून वाहणारे पावसाचे पाणी विहीर पुनर्भरणासाठी वापरले तर निश्चितच दोन ते तीन वर्षात विहीर पाणी पातळीत १.५ ते २ मीटर पर्यंत वाढ दिसून येते. पाण्याचा शाश्वत स्त्रोत निर्माण होऊ शकतो. उपलब्ध पाण्याचा वापर तुषार सिंचनाच्या माध्यमातून केल्यास पिकांचे शाश्वत उत्पादन मिळू शकते.

किती येतो खर्च ?: शेतकऱ्यांनी स्वतः वाळू, विटा, सिमेंट खरेदी करून बांधकाम केल्यास दहा हजार रुपयापर्यंत खर्च येऊ शकतो. एकदा हे बांधकाम व्यवस्थित केले तर त्याचे आयुष्यमान १० ते १५ वर्षे राहते. फक्त दर दोन वर्षांनी गाळण टाकी आणि साहित्याची स्वच्छता करावी.

# योग्य पद्धतीने करा कांदा काढणी अन् साठवणूक

कांदा एक अत्यावश्यक कृषी उत्पादन आहे, मात्र, कांद्याची योग्य काढणी आणि साठवणूक महत्त्वाची असते, जेणेकरून त्याची गुणवत्ता आणि टिकाव वाढवता येईल.

कांदा काढणीची योग्य वेळ आणि पद्धत : कांदा साधारणपणे १०० ते ११० दिवस लागवडीपासून काढणीस तयार होतो. त्याच्या पक्वतेची निशाणी म्हणजे पातींचा रंग पिवळसर होतो आणि नवीन पातींची वाढ थांबते. वरच्या पातींचा भाग मऊ होऊन आपोआप वाळतो. यालाच मान पाडणे असे म्हणतात. या प्रक्रियेच्या दरम्यान कांद्याच्या मानांना पीळ देऊन त्यांची योग्य उंची ठेवणे आवश्यक आहे. कांद्याच्या पातीच्या मऊ होणाऱ्या भागाला हाताळताना त्याचा रंग, वाळवलेला भाग, आणि पात यांच्या स्थितीवर लक्ष ठेवावे लागते. कांद्याच्या पातीच्या मानेला ३ ते ५ से.मी. (१ ते १.५ इंच) अंतर राखून कांदा कापल्यास, कांद्याचे तोंड बंद राहते. यामुळे सूक्ष्मजीवांचा शिरकाव होण्याचा धोका कमी होतो आणि कांदा जास्त काळ टिकतो. कांद्याची पात पूर्णपणे कापली जात असेल आणि मान न ठेवता कांद्याचे तोंड उघडे राहिले, तर ते सडू शकतात, त्याचा वजन कमी होऊ शकतो, आणि कांद्याच्या तोंडातून पाणी बाहेर जाऊ शकते. हे साठवणुकीत मोठे नुकसान करू शकते.

कांद्याची साठवणूक : कांद्याची साठवणूक करणाऱ्या शेतकऱ्यांना अनेक वेळा कांद्याच्या पातीच्या योग्य काढणी आणि मान पाडण्याबाबत माहिती नसते, आणि याचा परिणाम त्यांच्या साठवणुकीवर होतो. कांद्याची साठवणूक योग्य पद्धतीने केल्यास, कांद्याचा टिकाव वाढतो. कांद्याला थंड, हवेशीर आणि कोरड्या जागा लागतात. यामुळे कांद्याचे जीवनकाल वाढवता येतो. कांद्याच्या साठवणुकीसाठी हवेच्या गतीला नियंत्रणात ठेवणारी जागा सर्वोत्तम आहे.

निष्कर्ष : कांद्याच्या काढणीची योग्य पद्धत आणि साठवणूक याचा शेतकऱ्यांच्या नफ्यावर थेट परिणाम होतो. मान पाडणे, पाणी बंद करणे आणि योग्य काढणीची वेळ यामुळे कांद्याचे साठवणूक जीवनकाल वाढवता येतो, आणि शेतकऱ्यांना जास्त नफा मिळवता येतो. जर तुम्ही कांदा उत्पादन करत असाल, तर याच सखोल माहितीच्या मदतीने तुम्ही आपल्या कांद्याचा उत्कृष्ट पोत आणि टिकाव साधू शकता.



# जनावरांतील उष्णतेचा ताण कमी करण्यासाठी उपाय


जास्त उष्णता असल्यास जनावरांना थंड पाण्याने २ ते ३ वेळेस अंघोळ घालावी. गोठ्यामध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त जनावरे बांधू नयेत आणि रात्रीच्या वेळी मोकळ्या जागेवर जनावरे बांधून ठेवावीत. जनावरांचे थेट सूर्यप्रकाश आणि उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांच्या शेडच्या मुख्य प्रवेशद्वारावर वाळा किंवा तागाच्या पोत्याचा पडदा लावावा. गोठ्यामध्ये फॉगर्स लावावेत. त्यामुळे गोठा थंड राहतो. कोरड्या हवामानात ही पद्धत प्रभावी आहे.

मिस्टर्स :मिस्टर्समुळे तयार झालेल्या पाण्याच्या थेंबांचा आकार धुक्याच्या कणांपेक्षा थोडा मोठा असतो. मात्र दमट वातावरणात ही यंत्रणा फारशी प्रभावी ठरत नाही. दमट ऋतूमध्ये हवेतील ओलावा, थेंबांचा आकार मोठा असल्याने, पाण्याचे थेंब वातावरणात पसरण्याऐवजी जनावरांच्या गोठ्याच्या फरशीवर पडतात. यामुळे गोठा, चारा ओला होतो.

उष्णता कमी करण्याची नैसर्गिक यंत्रणा : उष्ण व दमट हवामानात जनावरांना सावली महत्त्वाची असते. जनावरांची त्वचा ओलसर ठेवून जनावरांच्या गोठ्यातील हवेचा प्रवाह वाढवून जनावरांच्या शरीरातून बाष्पीभवनाच्या साह्याने उष्णता कमी करता येते.

आहारात बदल : उच्च पर्यावरणीय तापमानात, शरीरातील बाष्पीभवन उष्णता कमी करण्याची मुख्य यंत्रणा म्हणजे घाम येणे आणि जलद श्वास घेणे. उच्च तापमानात, शरीरातील घामाद्वारे पाणी कमी होण्यामुळे तहान आणि मूत्र उत्सर्जनाद्वारे पाण्याचा वापर वाढतो. यामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. उन्हात असलेल्या जनावरांच्या





शरीरातून पोटॅशिअमची हानी होण्याचे प्रमाण फार वाढते. पोटॅशिअम वाचविण्याच्या प्रयत्नात, जनावरांमध्ये सोडिअमचे मूत्र उत्सर्जनातील प्रमाण वाढते. उच्च तापमानात श्वासोच्छ्वासाचा वेग वाढतो (बाष्पीभवनाद्वारे शरीराला थंड करण्याची एक महत्त्वाची पद्धत). शरीरातून कार्बन डायऑक्साइड वेगाने बाहेर पडल्यामुळे श्वसन क्षारता रिस्पायरेटरी अल्कलोसिस होतो. मूत्र विसर्जनाद्वारे शरीरातून बायकार्बोनेट बाहेर टाकून जनावर याची भरपाई करतात. त्यांच्या सतत बदलण्यासाठी जनावारांच्या रक्त रसायनशास्त्राचे व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे.

आहारामध्ये यीस्टचा समावेश : कोठीपोटाशी संबंधित यीस्ट जनावरांच्या आहारात समाविष्ट केले पाहिजे. यीस्टमुळे आम्लता ठीक झाल्याने ॲसिडिटीशी संबंधित समस्या कमी होतात. कोठीपोटामधील आहारातील तंतू आणि नायट्रोजनचा वापर पचनशक्ती वाढवून आहाराची उपयुक्तता वाढेल. यीस्टमुळे कोठीपोटामध्ये पचनासाठी फायदेशीर जिवाणू वाढतात.

आहारात अँटिऑक्सिडंट्सचा समावेश : उष्णतेच्या ताणादरम्यान, शरीरातील मुक्त कणाचे प्रमाण वाढल्यामुळे ऑक्सिडेटिव्ह तणाव वाढतो, ज्यामुळे जनावरांची प्रतिकारशक्ती आणि पुनरुत्पादक कार्य प्रभावित होते. त्यामुळे कासदाह, प्रजनन दर कमी होतो, गर्भमृत्यूचे प्रमाण वाढणे, अकाली जन्म होणे, जार न पडणे आदी समस्या वाढतात.

जंतुसंसर्ग टाळण्याचे उपाय : उन्हाळ्यात जनावरांमध्ये जंतुसंसर्ग झपाट्याने पसरतो, याला प्रतिबंध करण्यासाठी जनावरांची गव्हाण, पाण्याची टाकी नियमितपणे स्वच्छ करावी. टाकीला आतील बाजूस चुन्याचा थर द्यावा. नेहमी ताजा चारा द्यावा, शिळा चारा खाल्ल्याने जनावरांच्या पोटात अनेक जीवघेणे आजार होऊ शकतात. जनावर बांधण्याच्या जागेभोवती चुना शिंपडून संसर्गापासून संरक्षण केले जाऊ शकते.

संतुलित आहार : उन्हाळ्यामध्ये दुभत्या जनावरांना योग्य प्रमाणात संतुलित आहार द्यावा. धान्यामध्ये गहू, ओट्स, हरभऱ्याची साल, गव्हाचा कोंडा इत्यादी द्यावे सोबतच मीठ आणि गूळ मिसळून द्यावे. यामुळे जनावरांचे दूध उत्पादन चांगले राहते आणि जनावरे निरोगी राहतात. गव्हाचे पीठ, मैदा, भाकरी, तांदूळ इत्यादी कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असलेले अन्नपदार्थ जनावरांना देऊ नयेत. उन्हाळ्यामध्ये जनावरांना अधिक हिरवा चारा द्यावा, त्यात ७० ते ९० टक्के पाणी असते. जनावरांना दिवसातून किमान तीन वेळा स्वच्छ पाणी दिले पाहिजे. उष्णतेच्या ताणामुळे जनावरांच्या पचनसंस्थेवर विपरित परिणाम होतो आणि यासाठी व जनावरांना योग्य खुराक नियमितपणे द्यावा.जनावरांना खनिज क्षाराचा पुरवठा करण्यासाठी, बांधलेल्या जागी खनिज क्षाराची वीट बांधून ठेवावी. जनावरांना वेळोवेळी कॅल्शिअम योग्य मात्रेत द्यावे. कॅल्शिअमच्या कमतरतेमुळे जनावरांमध्ये अनेक आजार होतात.

cmyk



# अंबाजोगाईत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींचा निघाला मुक मोर्चा

## विविध मागण्यांचे उपजिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन






अंबाजोगाई। प्रतिनिधी

प्रतिनिधी आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या विधवा पत्नी व त्यांच्या कुटूंबियांना न्याय देण्यात यावा. त्यांच्या मागण्या मान्य करण्यात याव्यात. या व विविध मागण्यांसाठी बुधवारी विधवा महिलांचा मोठा मोर्चा राजीव गांधी चौकापासुन निघाला. उपजिल्हाधिकारी कार्यालय येथे महिलांनी विविध मागण्यांचे निवेदन उपजिल्हाधिकारी यांना दिले. या मोर्चाचे नेतृत्व आधार माणूसकीचा संस्थेचे अध्यक्ष ॲड.संतोष पवार यांनी केले. या मोर्चात शेतकरी संघटनेचे विभागीय अध्यक्ष कालिदास आपेट, किसानपुत्र आंदोलनाचे सुदर्शन रापतवार, अचूत गंगणे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

अन्नत्याग आंदोलन शेतकरी सहवेदना दिना निमित आत्महत्याग्रस्त शेतकरी यांच्या विधवा पत्नी व महिलांचा मुक मोर्चा बुधवारी दुपारी १२ वाजता राजीव गांधी चौकातून निघाला. हा मोर्चा मोंढा, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी महिलांनी आपल्या विविध मागण्यांचे निवेदन उपजिल्हाधिकारी यांना दिले. या निवेदनात प्रत्येक आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटूंबाला २५ लाख रूपयांचे अर्थसहाय्य देण्यात यावे. कुटूंबातील विद्यार्थ्यांचे पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण मोफत करण्यात यावे.

या कुटूंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विनातारण कर्ज तात्काळ मिळावे. या कुटूंबाला दैनंदिन उपजिविकेसाठी प्रति महा दहा हजार रूपये अनुदान द्यावे., प्रत्येक कुटूंबाला घरकुल व शौचालय योजनेचा लाभ द्यावा. प्रत्येक एकल पालक कुटूंबातील मुलांना सरसकट बालसंगोपन योजनेचा लाभ द्यावा. मुलांच्या शिक्षणासाठी शासकीय वसतीगृहात प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा. शेती गृह उद्योगासाठी तात्काळ कर्ज पुरवठा केला जावा., संजय गांधी निराधार योजनेचे मानधन वाढविण्यात यावे., शासनाच्या सर्व योजनांचा लाभ या कुटूंबाला मिळावा., अशा मागण्या यावेळी मांडण्यात आल्या. या सर्व महिलांनी आज शेतकरी सहवेदना दिनानिमित्त उपवास धरून तळपत्या उन्हात मुक मोर्चा काढला., या मुकमोर्चात महिला व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# आष्टी -कडा -साबलखेड रस्त्याचे काम रखडले

## दि.२४ मार्चला कड्यात रस्ता रोको आंदोलन

आष्टी । प्रतिनिधी

साबलखेड ते आष्टी या सतरा किलोमीटर रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षापासून सुरू असून यापैकी पन्नास टक्के देखील काम पूर्ण झाले नसल्याने व कामासाठी रस्ता खोदून ठेवल्याने सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.सार्वजनिक बांधकाम विभाग व संबधित गुत्तेदार यांना अनेक वेळा सूचना करूनही काम पूर्ण न झाल्याने दि.२४ मार्च रोजी सकाळी कडा येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते अनिल ढोबळे यांनी दिली.

बीड अहिल्यानगर राष्ट्रीय मार्गावरील आष्टी ते साबलखेड या १७ किलोमीटर रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षापासून सुरू आहे. या कामासाठी शासनाने अठरा महिन्याचा कालावधी दिला होता.तो संपून सहा महिने झाले आहेत .हे काम अत्यंत धीम्या गतीने आणि कुठलेही नियोजन नसलेले काम चालू असल्याने या रस्त्यावर वाहन चालवणे मोठे कसरतीचे ठरत आहे. पूर्ण मार्गावर सर्वत्र खोदून ठेवल्याने जामखेड ते नगर या मार्गावर वाहनचालक या रस्त्याऐवजी जामखेड मिरजगाव नगर असा प्रवास करत आहेत. कडा परिसरातील नागरिक देखील या रस्त्याने प्रवास करणे टाळत आहेत. त्याचा परिणाम कडा येथील बाजारपेठेवर झाला असून येथील व्यापाऱ्यांची दुकानेच काय पण नगर बीड रस्त्यावरील हॉटेल व्यवसाय देखील अडचणीत आहे. तसेच खराब रस्त्यावरुन जात असताना धुळीचे प्रचंड लोट निर्माण होत आहेत आणि लोकांना या संसर्गामुळे फुफुसाचे विकार व अनेक ॲलजी सदृश्य आजार होत आहेत. रस्त्याचे काम दोन वर्ष चालल्यामुळे जनता वैतागली आहे. यापुर्वी रस्त्याचे काम कंत्राटदार १५ मार्च २०२५ कालावधी पर्यत पूर्ण करणार हे राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी लेखी दिले होते. परंतु काम पुर्ण झालेले नाही. त्यामुळे सर्व व्यापारी, हॉटेल व इतर व्यावसायिक सोमवार दिनांक २४ मार्च रोजी तीव्र रास्ता रोको आंदोलन करणार आहेत.तसेच रस्ता काम दोन दिवसात न सुरु झाल्यास अधिकाऱ्यांना व अभियंत्याला बांगडया व चोळीचा आहेर देण्याचे आंदोलन करण्यात येईल. असा इशारा कडा शहरातील व्यापारी व नागरिकांनी दिला आहे.

# गोंधळी समाज बांधवाची बैठक


बीड : जिल्ह्यातील गोंधळी समाज बांधवाचीबैठक/३/२०२५ रोजी सकाळी १०वाजता श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान बार्शी रोड बीड ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे या बैठकीमध्ये समाजातील विविध प्रलंबित प्रश्नावर चर्चा होऊन त्या निवेदन देण्याचे ठरवण्यात येणार आहे यामध्ये महत्त्वाचे विषय म्हणजे घरकुल योजना, कलाकारांना मानधन,राशन कार्ड, ज्येष्ठ व वयोवृद्ध व्यक्तीला शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळत नाही यासाठी जिल्ह्यातील सर्वांनी एकत्र येऊन त्यावर सविस्तर चर्चा करून त्याचे निवेदन शासनाला द्यावयाचे आहे ,तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त गोंधळी समाजातील नागरिकांनी शनिवार दिनांक २२/ ३ /२०१९ रोजी सकाळी भगवान बाबा प्रतिष्ठान ,बार्शी रोड , हॉटेल गोल्डन चॉइस च्या मागे बीड या ठिकाणी बैठकीसाठी उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्ह्यातील समस्त गोंधळी समाज बांधव यांनी केले आहे.

# राजर्षी शाहू असोसिएशन व ढगेज् क्लासेसचे आदर्श पुरस्कार जाहीर

## प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठलराव लहाने यांच्या हस्ते होणार वितरण

अंबाजोगाई। प्रतिनिधी

मातीतल्या माणसा कडून मातीतल्या माणसासाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी प्रति वर्षाप्रमाणे राजर्षी शाहू मल्टीपर्पज असोसिएशन लातूर व ढगेज्? कोचिंग क्लासेस अंबाजोगाई यांच्या वतीने दिले जाणारे आदर्श पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत त्याचे वितरण दिनांक २३ मार्च २०२५ रविवार रोजी प्लास्टिक सर्जन आदरणीय डॉ. विठ्ठलराव लहाने व सुप्रसिद्ध अभिनेते सुनिल गोडबोले यांच्या हस्ते होणार आहे. राजर्षी शाहू



मल्टीपर्पज असोसिएशन लातूर व ढगेज्? कोचिंग क्लासेस अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आदर्श व्यक्तींना प्रतिवर्षी आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे तसेच ढगेज्? कोचिंग क्लासेस अंबाजोगाई यांच्या संकुलात शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण कार्यक्रम मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह येथे करण्यात येणार आहे

आदर्श पुरस्कार वितरण सोहळ्यात आदर्श शिक्षक, समाजरक्षक, उद्योजक, पत्रकार आणि समाजसेवक अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रतिभावंत व्यक्तींना गौरविण्यात येणार आहे. यावर्षीचा आदर्श समाजसेवक पुरस्कार श्री संतोष अच्युतराव पवार,आदर्श शिक्षिका पुरस्कार श्रीमती रंजना नाथराव जाधव, आदर्श समाजरक्षक पुरस्कार श्री मंगेश मारुती भोले,झिरो टू हिरो उद्योजकरत्न पुरस्कार श्री नरहरी राजेंद्र तपकिरे, आदर्श पत्रकार पुरस्कार श्री गोविंद राजाराम जाधव यांना जाहीर करण्यात आला आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन आदरणीय डॉ. विठ्ठलराव लहाने व महाराष्ट्राचे लाडके सुप्रसिद्ध मराठी अभिनेते मा.सुनील गोडबोले आवर्जून उपस्थित राहणार आहेत,त्याप्रसंगी प्लास्टिक सर्जन आदरणीय डॉ. विठ्ठलराव लहाने यांचे व्याख्यान होणार आहे तसेच पुरस्कारार्थींच्या प्रेरणादायी कार्यावर विशेष प्रकाश टाकण्यात येणार आहे.

समाजात सकारात्मक बदल घडवणाऱ्या या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी मनोहर अंबानगरितील सुजाण,सुसंकृत नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ,असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग सोपानराव ढगे , उपाध्यक्ष जी.डी. बनसोडे तसेच सचिव मिलिंद ढगे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### जाहिर प्रगटन

**मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५०३/२०२५**

**ॲड. बी. एन. तावरे यांचे मार्फत**

**कल्याण रोहिटे व ईतर वि. निरंक**

ज्याअर्थी माणिक पि. नारायण रोहिटे, हे दिनांक २५.०५.२०१५ रोजी आहेरवडगांव, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत त्याअर्थी, १. कल्याण पि. माणिक रोहीटे, वय ६४ वर्षे, धंदा शेती रा. आहेरवडगांव, ता. जि. बीड २. रघुनाथ पि. माणिक रोहीटे, वय ५७ वर्षे, धंदा शेती रा. आहेरवडगांव, ता. जि. बीड ३. मनोहर पि. माणिक रोहीटे, वय ५४ वर्षे, धंदा शेती रा. आहेरवडगांव, ता. जि. बीड अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताची मुले आहेत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २५.०४.२०२५ ही आहे.**

**आज दिनांक १७.०३२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.**

आदेशावरून

स्वाक्षरित **क लिपीक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड | शिक्का | स्वाक्षरित **अधिक्षक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

# झेडपीच्या विद्यार्थ्यांची मस्तगडास भेट

जालना। प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना आपल्या स्वतःच्या जिल्ह्याची ऐतिहासिक, भौगोलिक आणि प्रशासकीय माहिती होण्यासाठी 'माझा जालना जिल्हा आणि मी' हा उपक्रम जिल्हा परिषदेच्या पाटोदा शाळेतील गंगाधर वानोळे या उपक्रमशील शिक्षकाने हाती घेतला असून या उपक्रमांतर्गत १७ मार्च रोजी अनंता चव्हाळ, रुद्र वायाळ, रुद्रांश जोशी, सौरभ नजान, समर्थ काळे, समर्थ गोरे, माधुरी बोराडे व अक्षरा परभने या पहिलीच्या विद्यार्थ्यांनी जालना शहरास भेट देऊन शहरातील ऐतिहासिक मस्तगड किल्ला पाहिला. याशिवाय उंबरखेडचा किल्ला, मोती बाग, मोती तलाव, जिल्हा स्काऊट व गाईड



कार्यालय, जिल्हा क्रीडा प्रबोधिनी, तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, जालना शहर महानगरपालिका, कुंडलिका नदी आदींचीही पाहणी गंगाधर वानोळे यांच्यासोबत केली. मुख्याध्यापक संतोष तोटेवाड, अनुजा पाटील, गीता बरसाले, देविदास मामीलवार यांनी सहकार्य केले.

# घराचे कुलूप तोडून दिवसाढवळ्या चोरी

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील लहामेवाडी येथे सोमेश्वर आश्रुबा कापसे यांच्या घराचे दिवसाढवळ्या कुलूप तोडून घरातील साडेदहा लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी पळविल्याची घटना दि १७ मार्च सोमवार रोजी घडली आहे.या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

माजलगाव तालुक्यातील लहामेवाडी येथील शेतकरी सोमेश्वर आश्रुबा कापसे व त्यांच्या घरातील सर्व लोक हे रोजच्या प्रमाणे घराला कुलूप लावून शेतात काम करण्यासाठी गेले होते.या संधीचा फायदा घेऊन व पाळत ठेवून अज्ञात चोरट्यांनी दि १७ मार्च सोमवार रोजी दुपारी २:०० ते ३:०० वाजण्याच्या सुमारास घराचे कुलूप तोडून घरातील ठेवलेले नगदी चार लाख रुपये सोन्या, चांदीचे दागिने व नगदी साडेतीन लाख असा एकूण साडेदहा लाख रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी पळविला असून माजलगाव ग्रामीण पोलिसांनी स्वान पथक आणले होते. या चोरीमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमेश्वर आश्रोबा कापसे यांच्या फिर्यादीवरून माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक एस. एन.सोनवणे,एस. आर.बळवंते हे करत आहेत. दरम्यान घटनास्थळी श्वान पथक,दरोडा प्रतिबंधक पथक, ठसे तज्ञ पथक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने भेट दिली आहे.

### जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती पी डी चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ४६७/२०२५**

**ॲड. जी ए मात्रे**

**अनिता बारीकराव चव्हाण व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. अनिता बारीकराव चव्हाण, वय-४८ वर्षे धंदा-घरकाम, रा. आहेर वडगांव, ता. जि. बीड २. लक्ष्मण पि. बारीकराव चव्हाण वय-२५, वर्षे, धंदा-शेती, रा. आहेर वडगांव, ता. जि. बीड ३. बालाजी पि. बारीकराव चव्हाण वय-२३, वर्षे, धंदा-शेती, रा. आहेर वडगांव, ता. जि. बीड ४. कृष्णा पि. बारीकराव चव्हाण वय-१७, वर्षे, धंदा-शिक्षण, रा. आहेर वडगांव, ता. जि. बीड, अर्जदार क्र.४ अज्ञान, अ.पा.क आई अर्जदार क्र. १. ५. सुजानाबाई भ्र. शाहुराव चव्हाण वय-८०, वर्षे, धंदा-घरकाम, रा. आहेर वडगांव, ता. जि. बीड

(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत बारीकराव पि. शाहुराव चव्हाण यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत बारीकराव पि. शाहुराव चव्हाण यांचा मृत्यु दिनांक ०१.१२.२०१९ रोजी मौजे आहेर वडगांव, ता. जि.बीड येथे झाला असुन अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ ते ४ हे मयातचे मुले असुन अर्जदार क्र. ५ ही मयताची आई आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत बारीकराव पि. शाहुराव चव्हाण यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **आज दिनांक १९ मार्च २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९ एप्रिल २०२५.**

आदेशावरून

स्वाक्षरित **क लिपीक** | शिक्का | स्वाक्षरित **अधिक्षक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

### जाहिर प्रगटन

**मा. श्री.ए.एम.पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ४६८/२०२५**

**ॲड. तावरे बी.एन यांच्या मार्फत**

**ललिता गणेश वाघ वि. निरंक**

ज्यापेक्षा गणेश पि. शंकर वाघ, हे दिनांक २५.१०.२०२० रोजी बीड, ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१ ललिता भ्र. गणेश वाघ, वय ४४ वर्षे, रा. पोष्टमन कॉलनी, कॅनॉल रोड, बीड ता.जि. बीड, २. स्नेहा पि. गणेश वाघ, वय-२६ वर्षे, रा. पोष्टमन कॉलनी, कॅनॉल रोड, बीड ता.जि.बीड, ३. आदित्य पि. गणेश वाघ, वय-२३ वर्षे, रा. पोष्टमन कॉलनी, कॅनॉल रोड, बीड ता.जि.बीड अर्जदार नं. १ ही मयत नामे गणेश पि. शंकर वाघ, यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी असुन अर्जदार क्र. ३ हा मयताचा मुलगा आहे. मयताची आई यापुर्वीच मयत झालेली आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत गणेश पि. शंकर वाघ, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख ३०/०४/२०२५ आहे.**

**आज दिनांक १८ मार्च २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.**

आदेशावरून

स्वाक्षरित **क लिपीक** | शिक्का | स्वाक्षरित **अधिक्षक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

# बेपत्ता अल्पवयीन मुलीचा शोध लागत नसल्याने आईचा आत्मदहनाचा इशारा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवत पळवून नेल्याची घटना अंबाजोगाई तालुक्यात घडली असून या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यास गेलेल्या पालकांना युसुफ वडगाव पोलीस स्टेशन येथे जाण्यास अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथून सांगण्यात आले तदनंतर युसुफ वडगाव पोलीस स्टेशन येथे फेब्रुवारी महिन्यात गुन्हा दाखल झाला आहे मात्र एक महिना उलटला तरी याबाबतीत कोणाचाही शोध लागला नाही नातेवाईकांनी पोलिसांकडे विचारपूस केली असता पोलीस उडवा उडवी ची उत्तर देत प्रकरण मिटवण्यास सांगत असल्याचा गंभीर आरोप मुलीच्या नातेवाईकांनी प्रतिनिधीशी बोलताना केला आहे. मुलीचा शोध लागत नाही म्हणून तिच्या आईने गुरुवार दिनांक २० मार्च रोजी युसुफ वडगाव पोलीस स्टेशन समोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

सदरील हकीकत अशी की दि ०५ फेब्रुवारी रोजी दुपारी ०२ वा सुमारास मुलीची आई कुबेफळ ता अंबाजोगाई जि बीड येथे घरी असताना माझा गोबाईल वर माझा भाचा गोपाळ हरिभाऊ काळे याने माझी मुलीस मोबाईल वरून फोन करुन मी तुमची मुलीला घेऊन जात आहे असे म्हणाला त्यानंतर मी माझा भावास फोन करून मुलीस कॉलेजमध्ये जाऊन त्याला बघ असे त्याला सांगितल्यावर दुपारी ०४ वा सुमारास माझ्या भावाने मला फोन करुन सांगितले की साझी मुलगी व तुझी मुलगी या दोघी सकाळी १० वा घरुन कॉलेजला जाते म्हणुन घरुन गेल्या होत्या मी आता कॉलेज मधुन जाऊन पाहीले असता तुझी मुलगी ही कॉलेजमध्ये दिसली नाही पण माझी मुलगी ही कॉलेजमध्ये दिसली व तिने मला सांगितले की कॉलेजमध्ये गेल्यानंतर अंदाजे सकाळी १० वा सुमारास मुलीची आत्या मिरा हरिभाऊ काळे व तिचा मुलगा गोपाळ हे कॉलेजच्या समोर दिसले त्यावेळी ती म्हणाली की तु पुढे जा मी आत्याला बोलुन येते त्यावेळेस थोड्या अंतरावर गेली असता मुलीला तिची आत्या मिरा व तिचा मुलगा गोपाळ याने तुझ्या सोबत माझ्या मुलाला लग्न कारायचे आहे असे सांगुन तिला लग्नाचे अमिष दाखवुन, फुस लावुण चार चाकी वाहनात बसवून घेऊन गेले आहेत असे मला सांगितल्याने मी त्यानंतर कुंबेफळ येथुन निघुन ०६.०० वा सुमारास अंजनपुर येथे गेले व माझ्या भावाची मुलगी भेटली तिने सकाळी आपेगाव येथे झालेला प्रकार मला सांगितला त्यांनतर आम्ही माझी मुलगी हीचा अजनपुर, कोपरा धानोरा गावात तसेच नातेवाईक यांच्या कडे शोध घेतला.

परंतु माझी मुलगी मिळुन आली नाही. त्यानंतर दि ०६ फेब्रुवारी २०२५ रोजी मी व माझा मुलगा असे आम्ही आपेगाव येथे कॉलेजमध्ये जाऊन माझ्या मुली बाबत चौकशी केली असता तेथील शिक्षकांनी ती काल दि ०५ फेब्रुवारी २०२५ रोजी पेपरला गैरहजर राहीलेली आहे असे आम्हाला सांगितले त्यानंतर आम्ही भावठांना येथे जाऊन मुलीचा शोध घेतला असता ती दिसून आली नाही तसेच तिची आल्या मिरा हरिभाऊ काळे व मिराचा मुलगा गोपाळ हे पण त्यांचे घरी भावठाणा येथे मिळुन आले नाहीत म्हणुन आमची खात्री झाली की माझ्या मुलीला आत्या मिरा हरिभाऊ काळे व तिचा मुलगा गोपाळ रा भावठाणा हेच फुस लावुन पळवून नेले आहे त्यानंतर आजपर्यंत आम्ही आमचे व त्याचे सर्व नातेवाईकांकडे त्यांचा शोध घेतला परंतु तेन मिळून आले नाहीत. तरी दि ०५/०२/२०२५ रोजी १०.०० वा सुमारास माझी मुलगी हीची आत्या मिरा हरिभाऊ काळे व मिरा हीचा मुलगा गोपाळ हरिभाऊ काळे रा भावठाना ता अंबाजोगाई यांनी लग्नाचे अमिष दाखवुन जय किसान माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय आपेगाव येथुन चार चाकी वाहनात बसवुन घेऊन गेले आहेत म्हणून माझी त्यांचविरुद्ध तक्रार आहे अशी फिर्याद मुलीच्या आईने दिली आहे.

मात्र फिर्याद देऊन एक महिना उलटला तरी पोलीस प्रशासन बघ्याची भूमिका घेत असून उडवा उडवीची उत्तरे देत आहेत व प्रकरण मिटवण्याची भाषा करत असल्या मुळे तसेच काहीही करून मुलगी मिळत नाही पोलीस प्रशासन ही साथ देत नाही या नैराश्येतून मुलीच्या आईने २० मार्च २०२५ रोजी युसुफ वडगाव पोलीस स्टेशन येथे आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

cmyk

# सामाजिक उपक्रम कायमस्वरूपी सुरू ठेवावे त्यामध्ये खंड पडू देऊ नये -आमदार सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

**शहरात सरकारी कामासाठी व आठवडी बाजारात तालुक्यातील व परीसरातील नागरीकांची वर्दळीत कडक उन्हाच्या चटक्यामुळे नागरीक हैरान होत आहेत.सकाळी नऊ वाजेपासूनच उन्हाचा चटका जाणवत आहे. वाटसरूंना थंड पाणी पिण्यास मिळावे यासाठी नगरसेवक बाळासाहेब घोडके यांनी पाणपोईची या वर्षीपासुन सुरूवात केली पानपोइ सारखे सामाजिक उपक्रम हे चांगले असून ते नियमित चालू ठेवले पाहिजेत हे सामाजिक उपक्रम जाहिरात बाजीपुरता न ठेवता यातुन सातत्य राखले पाहिजे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.**




गेल्या दहा ते पंधरा दिवसांपासून उन्हाची तीव्रता वाढली आहे. उन्हाच्या चटक्यामुळे नागरीक आजारी पडत आहे. सकाळी नऊ वाजेपासून उन्हाचा उन्हाचा चटका सुरू होऊन सायंकाळी सहा वाजेपर्यंत असतो.याची दखल घेत नवनिर्वाचित नगरसेवक बाळासाहेब घोडके यांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पाणपोई चे नुकतेच आमदार सुरेश धस यांच्याहस्ते उद्घाटन करून सुरूवात करण्यात आली.यावेळी ते आमदार धस बोलत होते.यावेळी खंडू दादा जाधव,जिया बेग,रंगनाथ धोंडे,भारत मुरकुटे,शैलेश सहस्रबुद्धे,किशोर झरेकर ,सुनिल रेडेकर,बाबू कदम,दुर्गेश कुलकर्णी,विजय साठे,अंगद शिंदे,इरशान खान सतीश टकले,ज्योतिबा रेडेकर,दीपक उंबरकर,अविनाश निंबाळकर,सचिन रानडे यांच्यासह आदि उपस्थित होते.यावेळी पुढे बोलतांना आ.धस म्हणाले,घशाची कोरड कमी होण्यासाठी थंड पाण्याची गरज असते. उन्हाची तीव्रता पाहता बाटली बंद पाण्याचे भाव वाढले आहे.परंतू सर्वसामान्यांची पाण्यासाठी भटकंती होऊ नये, बाहेर गावाहून येणाऱ्या सामान्य शेतकरी व ग्राहकांसाठी आष्टी शहरांमध्ये ठिकठिकाणी पाणपोई असणे गरजेचे आहे ही गरज नगरसेवक बाळासाहेब घोडके यांनी ओळखून या ठिकाणी पानपोई सुरू केली हे कौतुकास्पद आहे पानपोइ सारखे सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेतयासाठी बाळासाहेब घोडके यांनी येणाऱ्याजाणाऱ्या साठी रस्त्यावर पाणपाई सुरू केली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मोठ्या संख्येने आष्टी शहरातील नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मस्साजोग येथे नाम फाउंडेशनमार्फत नदी खोली करण्याच्या कामाला सुरुवात

**बीड । प्रतिनिधी**

आज मस्साजोग तालुका केज येथे नाम फाउंडेशन मार्फत नदी खोली करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. पोकलेनने कामाचा शुभारंभ झाला असून ॲड. अजित देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. स्वर्गीय सरपंच संतोष देशमुख यांचे गाव पाणीदार करण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हा प्रयत्न असून यातून गाव सधन होईल. गावकऱ्यांनी जास्तीत जास्त काम करून घेण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन यावेळी जनआंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.



ॲड.अजित देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन

मस्साजोग येथील तीन किलोमीटर परिसरातील नदी पात्र खोलीकरण आणि रुंदीकरणाचे काम नामच्या माध्यमातून करण्यात येत आहे. या कामाचा आज शुभारंभ झाला. दोन-तीन दिवसात दुसरी पोकलेन मशीन देखील गावात येणार आहे.

गावाच्या मध्यभागातून जाणारी नदी ही पाणीदार होणार आहे. यातून गाव समृद्ध होईल. धनंजय देशमुख, भागवत कदम जालिंदर देशमुख, तुषार देशमुख आणि इतरांबरोबर याबाबत चर्चा झाली. पावसाळा अजून लांब असल्यामुळे अडीच महिन्यापेक्षा जास्त कालावधी कामासाठी उपलब्ध आहे. या कालावधीमध्ये जास्तीत जास्त काम करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. पाणी अडवल्याने किती फायदा होतो, हे आता शेतकऱ्यांना समजले आहे. पाणी कोठेही साठले तरी परिसरात सर्वत्र पसरत असते. त्यामुळे जास्तीत जास्त पाणीसाठा निर्माण व्हावा, यासाठी प्रयत्न असेल, असेही ॲड. देशमुख यांनी म्हंटले आहे. यावेळी शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## अंबाजोगाई येथे लिंगायत कोष्टी समाज महिला संघटनेची स्थापना

### उमराणे, रांजणकर व होळगे या रणरागिनींचाही सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आणि महाराष्ट्र राज्य लिंगायत कोष्टी समाज संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त अंबाजोगाई येथे भव्य महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरवात श्रृती बिरंगे यांनी स्वागत गीत गाईले व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते चौंडेश्वरीदेवीच्या प्रतिमेची पुजा व दिप प्रज्वलन करून झाली,लिंगायत कोष्टी समाजाच्या महिला संघटनेची




स्थापना करण्यात आली असून, नवनिर्वाचित कार्यकारिणी सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

संघटनेच्या महिला अध्यक्षा सौ. सुनंदाताई आष्टगी यांच्या हस्ते कार्यकारिणी सदस्यांना नियुक्ती पत्र प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. नव्याने स्थापन झालेल्या कार्यकारिणीमध्ये पुढील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अध्यक्ष: सौ. सीमा वरवटकर उपाध्यक्ष: सौ. वर्षा चिमणगुंडे सचिव: सौ. अश्विनी नंदिकोले सहसचिव: सौ. किशोरी शेंगुळे कोषाध्यक्ष: सौ. सीमा शेंगुळे संघटक: सौ. श्रद्धा मसनाळे आदींची निवड करण्यात आली.महिला दिनानिमित्त समाजातील कष्टमय जीवन जगत ◀◀ पान ३ वर

## पुरूषोत्तमपुरीत प्रेमप्रकरणातून प्रेमीयुगलाने घेतले विषारी औषध

**माजलगाव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी येथे मुलीचे आईवडील लग्नास नकार देत असल्याने प्रेमीयुगलाने विषारी औषध घेतल्याची घटना घडली असुन याप्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलिसात एमएलसी नोंद करण्यात आली आहे. दरम्यान मुलीची प्रकृती बरी असुन मुलाची मात्र प्रकृती गंभिर आहे.**

**घरच्यांचा लग्नास नकार; ग्रामीण पोलिसात एमएलसी दाखल**

तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी येथील सुरज विश्वांभर मोरे व पुजा राधाकिसन सोनवणे या दोघांचे एकमेकांवर प्रेम आहे. सुरज व पुजा हे दोघे सज्ञान असुन हे प्रेमयुगल लग्न करणार होते. मुलगी सुध्दा या लग्नास तयार होती परंतु दुसरे पाहुने येणार अशी चर्चा व आम्ही सांगतोन त्या मुलाशी लग्न कर अन्यथा आम्ही आमच्या जिवाचं बरं वाईट करू अशा धमक्या आई - वडीलांकडुन मिळत असल्याने व आई - वडीलांकडुन लग्नास विरोध होत असल्याने मुलीने विषारी औषध प्राशन केले तर मुलाने देखील विषारी औषध घेवुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना नुकतीच घडली आहे. हे प्रेमयुगल सध्या मरणाशी झुंज देत असुन माजलगाव ग्रामीण पोलिसात एमएलसी नोंद करण्यात आली आहे.दरम्यान दोघांवरही उपचार सुरू असुन मुलीची प्रकृती बरी असली तरी मुलाची मात्र गंभिर परिस्थिती आहे.

## विलास भोगाडे यांच्यावर खोटा गुन्हा दाखल केलेल्या प्रकरणात निर्दोष मुक्तता

### आष्टी न्यायालयाचा निकाल

**आष्टी । प्रतिनिधी**


**जमिनीच्या विनाकारण वाद काढत आष्टी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आलेल्या प्रकरणात आरोपी विलास भोगाडे व लताबाई भोगाडे यांची आष्टी न्यायालयाचे न्यायाधीश एम.के.पाटील यांनी दोन्ही बाजूंची युक्तीवाद एकूण वरील आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.**

फिर्यादी रामदास आनंदा गाडे, रा.पोखरी ता.आष्टी,जि.बीड हे गेल्या तीन ते सहा वर्षापासुन करंजी येथील मनोज चौधरी यांचे कडे सालगडी म्हणुन काम करतात.ते तेथे त्यांच्या पत्नी व मुलासंह राहातात. दिनांक ०४/०४/२०२१ रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास पांढरी गावाती मनोज सदाशीव चौधरी यांच्या जागे मध्ये नगर बीड रस्त्या लगत कंपाऊंड करुन गेट लावण्यात आले असुन तेथे असलेल्या पत्रयाचे रुम मध्ये फिर्यादी हे खाट वर झोपलेले असताना शेजारील आरोपी हे तेथे घुसुन तु हया मालकाकडे कशाला सालाने राहतोस असे म्हणुन त्यांना शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादी यांनी आरोपींना मी गरीब माणुस आहे मला शिव्या देऊ नका माझ्या मालकाला बोलवा असे म्हणाले असता आरोपी यांनी त्यांच्याकडील लपवुन ठेवलेला लोंखडी पाईप पळत जाऊन आणला व त्या पाईपने फिर्यादी ते उताने झोपलेले असताना फिर्यादी यांच्या अवघड जागेवर जोरात मारला. त्यामुळे फिर्यादी यांनी आरडाओरडा केला असता आरोपी क्रं. २ हीने भाड्याला जिवेच मारा असे म्हणुन तिच्या हातामधील काठीने फिर्यादी यांना पाठीत मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी यांची पत्नी ही बाहेर गेली होती व भांडणाचा आवाज ऐकुन तेथे आली. त्यावेळी फिर्यादी यांची पत्नी ही भांडण सोडवत असताना आरोपी क्रं. २ हीने तिला ढकलुन दिले व दोन्ही आरोपीने फिर्यादीला तुला आता थोडे मारले आहे नंतर तुला तुझया मालकावर विनयभंगाची खोटी केस करुन मोठ्या केस मध्ये गुंतवुन टाकीन तु जर पोलीसांत गेलास तर तुझे तंगडे तोडुन टाकीन पोलीस आमचे काहीही वाकडे करु शकणार नाही असे बोलले. त्यावेळी फिर्यादी यांना दुखापत ◀◀ पान ३ वर

## दिंद्रुड : सैलानी बाबाचा उर्स व संदलचे आयोजन

दिंद्रुड । प्रतिनिधी

हिन्दु-मुस्लीम, बौद्ध बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील सैलानी बाबाचा प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षे मोठा उत्सव व संदल होणार आहेत रविवारी दि. २३ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५:३० वाजता उंटावरून संपूर्ण गावात भव्य मिरवणूक निघून या उत्सवाची सुरुवात होईल या संदल निमित्त रविवारी सायंकाळी साडेनऊ वाजता कवालीचा मुकाबला होईल.तरी या उत्सवास उपस्थित राहुन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे भक्त विष्णुपंत भानुदास सोनवणे व गोविंद बुकाराम वाघमोडे



यांच्यासह उर्स कमिटीने केले आहे. दर वर्षी दिंद्रुड परिसरासह दुरवरुन महिला,अबाल वृध्द भाविक -भक्त या उरुसला मोठ्या श्रद्धेने उपस्थिती लावतात. भक्तांच्या उपस्थितीने या भागात यात्रेचे स्वरूप येते.या देवस्थान भागातील समिती सदस्य व संयोजक या उत्सवाच्या तयारीत आहेत.

## दोन वर्षापासून आष्टी -कडा -साबलखेड या राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्याचे काम रखडले

### २४ मार्चला कड्यात रस्ता रोको आंदोलन

आष्टी । प्रतिनिधी

साबलखेड ते आष्टी या सतरा किलोमीटर रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षापासून सुरू असून यापैकी पन्नास टक्के देखील काम पूर्ण झाले नसल्याने व कामासाठी रस्ता खोदून ठेवल्याने सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.सार्वजनिक बांधकाम विभाग व संबधित गुत्तेदार यांना अनेक वेळा सूचना करूनही काम पूर्ण न झाल्याने दि.२४ मार्च रोजी सकाळी कडा येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते अनिल ढोबळे यांनी दिली.

बीड अहिल्यानगर राष्ट्रीय मार्गावरील आष्टी ते साबलखेड या १७ किलोमीटर रस्त्याचे काम गेल्या दोन वर्षापासून सुरू आहे. या कामासाठी शासनाने अठरा महिन्याचा कालावधी दिला होता.तो संपून सहा महिने झाले आहेत .हे काम अत्यंत धीम्या गतीने आणि कुठलेही नियोजन नसलेले काम चालू असल्याने या रस्त्यावर वाहन चालवणे मोठे कसरतीचे ठरत आहे. पूर्ण मार्गावर सर्वत्र खोदून ठेवल्याने जामखेड ते नगर या मार्गावर वाहनचालक या रस्त्याऐवजी जामखेड मिरजगाव नगर असा प्रवास करत आहेत. कडा परिसरातील नागरिक देखील या रस्त्याने प्रवास करणे टाळत आहेत. त्याचा परिणाम कडा येथील बाजारपेठेवर झाला असून येथील व्यापाऱ्यांची दुकानेच काय पण नगर बीड रस्त्यावरील हॉटेल व्यवसाय देखील अडचणीत आहे. तसेच खराब रस्त्यावरुन जात असताना धुळीचे प्रचंड लोट निर्माण होत आहेत आणि लोकांना या संसर्गामुळे फुफुसाचे विकार व अनेक ॲलजी सदृश्य आजार होत आहेत. रस्त्याचे काम दोन वर्ष चालल्यामुळे जनता वैतागली आहे. यापुर्वी रस्त्याचे काम कंत्राटदार १५ मार्च २०२५ कालावधी पर्यत पूर्ण करणार हे राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी लेखी दिले होते. परंतु काम पुर्ण झालेले नाही. त्यामुळे सर्व व्यापारी, हॉटेल व इतर व्यावसायिक सोमवार दिनांक २४ मार्च रोजी तीव्र रास्ता रोको आंदोलन करणार आहेत.तसेच रस्ता काम दोन दिवसात न सुरु झाल्यास अधिकाऱ्यांना व अभियंत्याला बांगडया व चोळीचा आहेर देण्याचे आंदोलन करण्यात येईल. असा इशारा कडा शहरातील व्यापारी व नागरिकांनी दिला आहे.

## घाटनांदुर परिसरातील सोयाबीन व हरभऱ्याचे ढीग जाळले

घाटनांदूर । प्रतिनिधी

शिवारातील शेतातील सोयाबीन व हरभऱ्याचे पिक कापून लावलेले ढीग अज्ञात व्यक्तीने (ता.१८) मंगळवारी रात्री जाळल्याची घटना घडली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेले घास हिरावून घेतला आहे. घाटनांदूर शिवारातील गट नं ६६६ मध्ये रामचंद्र डाके यांच्या मालकीच्या पाच एकर शेतातील सोयाबीन व हरभरा पिक कापणी करून खळे करण्याच्या उद्देशाने ढीग लावून ठेवले होते. वसंत देवराव सिरसाट यांच्या मालकीच्या गट नं ६६६ मधील दोन एकर मधील सोयाबीन व हरभरा पिक कापणी करून ढीग लावून ठेवले होते. परंतू अज्ञात व्यक्तीने (ता.१८) मंगळवारी रात्री सोयाबीन व हरभऱ्याचा ढीग जाळ्याने रामचंद्र डाके यांचे तीन लाख पंचेचाळीस

हजाराचे तर वसंत सिरसाट यांचे त्र्यानऊ हजारचे नुकसान झाले असून अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार



दिलीआहे. तर दुसऱ्या घटनेत रामभाऊ आबासाहेब गित्ते यांचे दत्तपूर शिवारातील गट नं १०० मधील सहा एकरातील हरभऱ्या ढीग जाळून टाकल्याने अडीच लाखाचे नुकसान झाले आहे. परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

## युसूफ वडगावच्या अमोल जाधवचे आयआयटी पात्र परिक्षेत घवघवीत यश

**युसूफवडगाव । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील अमोल जाधव याने आयआयटी पात्र गेट परिक्षेत ऑल इंडिया रँक मध्ये ७४७ वा नंबर मिळवून दैदिप्यमान असे यश मिळवले आहे.**



एका शेतकरी कुटुंबातील मुलगा इच्छाशक्ती,मेहनत व कष्टाच्या जोरावर काय करू शकतो याचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे युसूफवडगांवचा सुपुत्र अमोल दत्तात्रय जाधव याने काल जाहिर झालेल्य आयआयटी पात्र गेट परिक्षेत घवघवीत असे यश संपादन करून ऑल इंडिया रँक ७४७ नंबर मिळवून आयआयटी साठी तो पात्र ठरला आहे.त्याचे प्राथमिक शिक्षण हे गावातील जि.प.शाळेत झाले तर बारावी पर्यंतचे शिक्षण लातुरला झाले तर सध्या तो पंढरपूर येथे इंजिनिअरींग शिक्षण घेत होता.इंजिनिअरींगचे शिक्षण घेत घेत त्याने आयआयटी पात्र गेट परिक्षाची तयारी चालू ठेवली आणि पहिल्याच प्रयत्नात तो आयआयटी प्रवेशास पात्र ठरला आहे याबद्दल त्याचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे त्यासोबतच आपल्या मुलासाठी शेतीत मजुरी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यातील हिंजवडी येथे टेम्पोला आग; चार जणांचा होरपळून मृत्यू

**पिंपरी । प्रतिनिधी**

एका कंपनीचे कर्मचारी घेऊन जाणाऱ्या टेम्पो ट्रॅव्हलसला अचानक भीषण आग लागली. या दुर्घटनेत चार जणांचा होरपळून मृत्यू झाला असून आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. पुण्यातील हिंजवडी परिसरात बुधवारी सकाळी ही धक्कादायक घटना घडली. जखमींना तातडीने नजीकच्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे, तर मृतदेह यशवंतराव चव्हाण रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी आठ वाजताच्या सुमारास टेम्पो ट्रॅव्हल्स कर्मचारी घेऊन निघाली होती. त्यावेळी टेम्पो ट्रॅव्हल्समध्ये अचानक आग लागली. अचानक लागलेल्या आगीमुळे काहींना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही, तर काही जणांचा मृत्यू झाला. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, प्राथमिक अंदाजानुसार शॉर्ट सर्किट किंवा इंजिनमधील बिघाडामुळे ही दुर्घटना घडली असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

याबाबत माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान, हिंजवडी पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले आहेत. पोलिसांनी घटनास्थळी मदतकार्य सुरू केले असून, आगीमागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणली असून, सध्या संपूर्ण परिसर तपासण्यात येत आहे. या दुर्घटनेत जखमी झालेल्यांना हिंजवडीतील रूबी हॉल क्लिनिक आणि अन्य जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेत इतर काही कर्मचारी जखमी झाले असून त्यांना जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

पोलीस तपास आणि प्राथमिक निष्कर्ष

हिंजवडी पोलिसांनी घटनास्थळी येऊन तपास सुरू केला आहे. प्राथमिक अंदाजानुसार, टेम्पोच्या इंजिनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने आग लागली असावी. तसेच, गाडीच्या मागील दरवाज्याच्या यंत्रणेत काही दोष होता का, याचाही तपास सुरू आहे.

# पालक रागावल्याने १३ वर्षीय मुलींनी सोडले घर

**पुणे । प्रतिनिधी**

घरातील कुटुंबीय आपल्यावर नेहमीच रागावतात म्हणून एकाच शाळेत शिकणार्या दोघा १३ वर्षीय मुलींनी घरातून पळ काढला. दरम्यान, त्या शाळेत न आल्यामुळे दोघी बेपत्ता झाल्याचे पालकांना कळाले. त्यांनी चंदनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. अवघ्या एका तासात दोन्ही मुलींचा शोध घेऊन पोलिसांनी त्यांना सुखरूप कुटुंबीयांच्या ताब्यात दिले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोन्ही मुलींना मंगळवारी (दि.१८) सकाळी नेहमीप्रमाणे शाळेत सोडण्यात आले होते. परंतु, सकाळी सातच्या सुमारास त्या शाळेत आल्या नसल्याचे पालकांना कळविण्यात आले. मुली बेपत्ता झाल्यामुळे त्यांनी थेट चंदनगर पोलिस ठाणे गाठले. घटनेचे गांभीर्य पाहता पोलिसांनी एकीकडे तक्रार दाखल करून घेण्याचे काम सुरू केले, तर दुसरीकडे मुलींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली. त्यातील एका मुलीकडे मोबाईल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार तांत्रिक विश्लेषणाद्वारे मुलींची माहिती पोलिसांनी घेतली. मुली अधून-मुधून मोबाईल चालू बंद करत होत्या. मुली कसबा पेठ येथे असल्याची माहिती मिळाली. त्या मुली एका रिक्षातून प्रवास करत असल्याचे समजले.

पोलिसांनी संबंधित रिक्षाचालकाला ही माहिती दिली. त्यानंतर पथकाने दोन्ही मुलींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत सुरुवातीला त्यांनी विविध स्टोरी तयार केल्या. परंतु, पोलिसांनी विश्वासात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की, आम्हाला घरातील सतत रागवातात. त्यामुळे आम्ही घरातून जाण्याचा निर्णय घेतला. सकाळी आम्हाला शाळेत सोडल्यानंतर आम्ही तेथून निघून आलो. एका ठिकाणी शाळेचा गणवेश बदलून, हडपसरला इतर ठिकाणी फिरलो. त्यानुसार तांत्रिक विश्लेषणाद्वारे मुलींची माहिती पोलिसांनी घेतली. मुली अधून-मुधून मोबाईल चालू बंद करत होत्या. मुली कसबा पेठ येथे असल्याची माहिती मिळाली. त्या मुली एका रिक्षातून प्रवास करत असल्याचे समजले. पोलिसांनी संबंधित रिक्षाचालकाला ही माहिती दिली. त्यानंतर पथकाने दोन्ही मुलींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत सुरुवातीला त्यांनी विविध स्टोरी तयार केल्या. परंतु, पोलिसांनी विश्वासात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की, आम्हाला घरातील सतत रागवातात. त्यामुळे आम्ही घरातून जाण्याचा निर्णय घेतला. सकाळी आम्हाला शाळेत सोडल्यानंतर आम्ही तेथून निघून आलो. एका ठिकाणी शाळेचा गणवेश बदलून, हडपसरला इतर ठिकाणी फिरलो. ही कामगिरी पोलिस उपायुक्त हिम्मत जाधव, सहायक पोलिस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक सीमा ढाकणे, पोलिस उपनिरीक्षक किरण मोरे, अंमलदार विजय टिकेकर, रामचंद्र गुरव, विश्वनाथ गोणे, नानासाहेब परतुरे, अमोल कोळेकर, भारत उकिर्डे, शिवाजी धांडे, मनोज भंडारी यांच्या पथकाने केली.

# स्वारगेट प्रकरणातील आरोपीच्या वकिलास मारहाण नव्हे, तर अपघातात जखमी; पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत निष्पन्न

**पुणे । प्रतिनिधी**

स्वारगेट बसस्थानक अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्तात्रेय गाडेचा वकील साहिल डोंगरे हे मारहाणीत जखमी झालेले नाहीत. तर दुचाकीवरून पडून जखमी झाल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाल्याची माहिती हडपसर पोलिसांनी दिली. साहिल डोंगरे यांनी मंगळवारी (ता. १८) हडपसर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. १७ मार्च रोजी मध्यरात्री काहीजणांनी हडपसर येथील गाडीतळ परिसरातून त्यांचे अपहरण केले. गाडीत बसवून बेदम मारहाण करून दिवे घाटात सोडून दिले, असे तक्रारीत म्हटले होते.



या प्रकरणी पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी हडपसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय मोगले यांना तपासाबाबत सूचना दिल्या. त्यानुसार तपास पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तपास सुरू केला. घटनास्थळ आणि परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासण्यात आले.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साहिल डोंगरे हे गाडीतळ येथील सागर बारमधून रात्री दहा वाजण्याच्या सुमारास मित्र अनिकेत मस्के समवेत बाहेर पडताना दिसत आहेत. मस्के बारमधून घरी गेल्याचे सांगत आहे. सीसीटीव्ही चित्रीकरण आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे डोंगरे हे १७ मार्च रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास आणि १८ मार्च रोजी दिवे घाट दुमेवाडी परिसरात असल्याचे दिसून आले. सासवड पोलिस ठाण्यातील अंमलदार यांना रात्री साडेअकराच्या सुमारास हॉटेल साईरूपजवळ एका दुचाकीस्वाराचा अपघात झाला आहे. तो बेशुद्धावस्थेत असून मदत हवी आहे, असा कॉल प्राप्त झाला होता. परंतु ते आगीच्या घटनेचा कॉल असल्यामुळे तेथे जाऊ शकले नाहीत. त्यानंतर सासवड येथील रुग्णवाहिकेच्या डॉक्टरांकडे चौकशी केली असता, त्यांनाही कॉल आल्याने ते मध्यरात्री बारा वाजण्याच्या सुमारास घटनास्थळी पोहचले. परंतु त्यांना जखमी व्यक्ती आढळून आली नाही.

डोंगरे यांनी त्यांचा अपघात झाल्याचे पहाटे १०८ क्रमांकावर स्वतः कॉल करून सांगितले. सासवड येथील ग्रामीण आरोग्य रुग्णालयातील रुग्णवाहिकेतून जखमी डोंगरे यांना उपचारासाठी नेण्यात आले. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता डोंगरे यांनी हडपसर पोलिस ठाण्यात त्यांचे अपहरण करून मारहाण झाल्याची तक्रार दिली. परंतु त्यांनी या उपचाराबाबत माहिती दिली नाही. हडपसर पोलिसांनी डोंगरे यांना ससून रुग्णालयात दाखल केले. डोंगरे यांचे अपहरण झाले नसून, अपघातात जखमी झाल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात पुढील कारवाई करण्यात येत असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय मोगले यांनी दिली. शिरूर तालुक्यातील गुनाट गावातील दत्तात्रेय गाडे याने २६ फेब्रुवारी रोजी पहाटे स्वारगेट बसस्थानकाच्या आवारात शिवशाही बसमध्ये तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार घडला होता. डोंगरे हे या प्रकरणातील आरोपी गाडेचे वकील आहेत.

# डॉक्टरचे अपहरण करून खुनाचा प्रयत्न; आरोपी जेरबंद

**आंबेगाव । प्रतिनिधी**

मंचर (ता. आंबेगाव) येथील डॉक्टरचे अपहरण करून खुनाचा प्रयत्न करून फरार झालेला कुख्यात, सराइताला जेरबंद करण्यास स्थानिक गुन्हे शाखेला यश आले. पोलिसांनी त्याच्याकडून एक गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे हस्तगत केली आहेत. प्रवीण ऊर्फ डॉलर सीताराम ओव्हाळ (वय ३२, रा. वाळद, ता. खेड) असे या संशयिताचे नाव आहे.

मंचर येथील डॉ. कैलास रघुनाथ काळे हे दि. ४ जानेवारी रोजी मोटारसायकलने पेठ ते मंचरला जात असताना आरोपींनी त्यांच्याकडील सफारी या चारचाकी वाहनाची मोटारसायकलला धडक देऊन डॉक्टरांना खाली पाडले. या वेळी त्यांचे अपहरण करून त्यांना निघोटवाडी परिसरात नेले, त्यांना जबर मारहाण करून २० लाख रुपये खंडणीची मागणी केली. त्यातील एक लाख रुपये घेऊन आरोपींपैकी एकाने डॉक्टरांना जिवे मारण्याच्या उद्देशाने गावठी पिस्तूलमधून गोळी झाडून दहशत निर्माण केली. त्यानंतर डॉ. कैलास काळे यांना पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाच्या कडेला पेठ घाटाजवळ सोडून दिले होते. याबाबत दि. ६ जानेवारी रोजी मंचर पोलिस ठाण्यात अपहरण आणि खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

हा गुन्हा गंभीर असल्याने पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांच्या




मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने हा गुन्हा उघडकीस आणून सराईत मुख्य आरोपी पवन सुधीर थोरात (रा. मंचर, ता. आंबेगाव) यास अटक केली होती. या गुन्ह्यात कुख्यात प्रवीण ऊर्फ डॉलर सीताराम ओव्हाळ याचा सहभाग असून, तो गुन्हा घडल्यापासून फरार होता. प्रवीणवर खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, आर्म ॲक्ट असे गुन्हे दाखल असल्याने तो स्वतःला वाचण्यासाठी फरार होता. तो आळेफाटा बसस्थानक परिसरात येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलिस जवान अक्षय नवले यांना मिळाली. त्या माहितीच्या आधारे शनिवारी (दि. १५) आळेफाटा बसस्थानक परिसरातून त्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. या वेळी अंगझडतीत त्याच्या कंबरेला एक गावठी पिस्तूल व मॅग्झिनमध्ये दोन जिवंत काडतुसे असा एकूण ५१ हजार रुपयांचा ऐवज मिळून आला आहे.

ही कामगिरी पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलिस अंमलदार दीपक साबळे, अक्षय नवले, संदीप वारे, राजू मोमीन, मंगेश थिगळे, विक्रम तापकीर, नीलेश सुपेकर यांनी केली.

# गोंधळ उडून चेंगराचेंगरी घटना

## भरतीसाठी आलेल्या अनेक मुली जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात महिला कारागृहाच्या मैदानी चाचणीसाठी पोलीस मुख्यालय असलेल्या शिवाजीनगर येथे मोठ्या प्रमाणावर आज पहाटे पासून मुलींची गर्दी झाली होती. पोलिसांच्या अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे मोठा फज्जा उडून गोंधळ उडाला. लोखंडी गेटचा दरवाजा मोडून मुली आत घसुल्या असल्याची घटना घडली आहे. या गोंधळात अनेक मुली जखमी झाल्या आहेत. काही मुलींच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. ५१३ कारागृह पदांसाठीची ही भरती प्रक्रिया असून गेटवर ३००० हून अधिक मुलींनी गर्दी केल्यामुळे ही घटना घडली असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. या प्रकरानंतर पालकांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.


सदरील भरती ही २०२२-२३ मधील पुणे कारागृह पोलिस भरती म्हणून रखडलेली आहे. एकूण ५१३ जागेसाठी ही रखडलेली भरती प्रक्रियेसाठी मैदानी चाचणीची परीक्षा घेण्यात येत आहे. आज सकाळी पुण्यातील शिवाजीनगर पोलिस मुख्यालयात पोलिस प्रशासनाकडून भरतीसाठी आलेल्या मुलींच्या रांगेतील नियोजनात गोंधळ उडाला. गेटवर झालेल्या गर्दीमुळे लोखंडी गेट तुटून पडला आणि त्यावरून मुली आतमध्ये पळत सुटल्या. यावेळी चेंगराचेंगरी झाली आणि ही घटना घटना घडली. या घटनेत अनेक मुलींना दुखापत झाली आहे. काही मुलींच्या पायला गंभीर स्वरुपाची दुखापत झाल्याची माहिती आहे. यावेळी स्थानिक पोलिसांशी बाचाबाची देखील झाली.

या घटनेनंतर पोलिस अधिकारी पवार म्हणून होते त्यांना देखील पालकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. खरंतर मुलींनी अनेक महिन्यांपासून या भरतीसाठी तयारी केली आहे. मैदानी चाचणीसाठी प्रचंड वेळ आणि मेहनत खर्ची केली आहे. पोलिसांच्या अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे मैदानी चाचणीमध्ये आपली मेहनत तर व्यर्थ जाणार नाही ना अशी भावना विद्यार्थी आणि पालकांमध्ये दिसत आहे.

# पुण्यात सिग्नलवर अश्लील चाळे; गौरव आहुजाच्या मित्राला जामीन मंजूर

**पुष । प्रतिनिधी**

पुण्यातील सिग्नलवर अश्लील चाळे केल्याप्रकरणी गौरव आहुजाच्या मित्राला जामीन मंजूर झाला आहे. भाग्येश ओसवाल याला पुणे सत्र न्यायालयाने बुधवारी जामीन मंजूर केला. भाग्येश ओसवाल हा गौरव आहुजा याचा मित्र आहे. आहुजाने अश्लील कृत्य केलं तेव्हा तो त्याच्यासोबत गाडीमध्ये होता.



पुण्यातील येरवडा भागात एका आलिशान गाडीतून उतरून गौरव आहुजाने एका सिग्नलवर लघुशंका करत अश्लील चाळे केले होते. यावेळी त्याचा मित्र भाग्येश ओसवाल हा गाडीत बसला होता. पुणे पोलिसांनी आहुजा यासोबत ओसवाल याला अटक करून न्यायालयात हजर केलं होतं. न्यायालयाने ओसवाल याची रवानगी येरवडा कारागृहात केली होती. बुधवारी पुणे सत्र न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला आहे.


येरवडा चौकात दारू पिऊन धिंगाणा घातल्यानंतर गौरव कराडला गेला होता. तिथून त्यानं व्हिडीओच्या माध्यमातून माफीही मागितली आणि त्यानंतर पोलिसांसमोर हजर झाला होता. त्यानं बीएमडब्ल्यूची नंबर प्लेटही बदलली होती. पोलिसांनी त्याची कारही जप्त केली आहे. आरोपी गौरव अहुजा आणि वडील मनोज अहुजा यांच्यावर क्रिकेट बेटींग तसेच खंडणीचे गुन्हे दाखल असल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. याआधी ही त्यांनी जेलवारी केली असल्याची माहिती आहे. लॉटरी हा अहुजा कुटुंबाचा पिढीजात व्यवसाय आहे. सध्या हे कुटुंब हॉटेल व्यवसायातही उतरले आहे. त्यांचे पुण्यात एक हॉटेल आहे. तर दुसरीकडे क्रिकेट बेटींगच्या अवैध व्यवसायात ही अहुजांचा सहभाग असल्याचं समोर आलेलं होतं.

# औरंगजेब कबरीच्या ठिकाणी मराठ्यांचे शौर्यस्मारक उभारावे-अमोल कोल्हे यांची मागणी

**नारायणगाव । प्रतिनिधी**

क्रूरकर्मा औरंगजेबाची कबर म्हणजे मराठ्यांच्या असीम शौर्याचे प्रतीक आहे. केंद्र आणि महाराष्ट्र सरकारने या ठिकाणी 'मराठ्यांच्या शौर्याचे स्मारक' उभारावे, अशी मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केली. त्याचबरोबर कुणाचीही राजकीय पोळी भाजण्यासाठी स्वतःच्या आयुष्याची होळी होऊ देऊ नका, असे आवाहनही त्यांनी तरुणाईला केले.

गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यातील वातावरण तापले आहे. त्यात अनेक राजकीय नेत्यांनी केलेल्या वक्तव्यांमुळे वातावरण कलुषित होत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या औरंगजेबाच्या कबरीचे उदात्तीकरण होऊ नये, या भूमिकेशी सहमती दर्शविताना खा. डॉ. कोल्हे यांनी, जो कुणी महाराष्ट्राकडे वाकड्या नजरेने बघेल,



त्याची अवस्था 'हीच' होईल, हे दाखवून देणारी ही कबर आहे, असे सांगितले.

छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, स्वराज्य सौदामिनी ताराराणी साहेबा आणि संताजी घोरपडे, धनाजी जाधव व अठरापगड जातींच्या मावळ्यांनी तब्बल २७ वर्षे औरंगजेबाला दख्खनमध्ये टाचा घासायला लावल्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य धुळीस मिळविण्यासाठी आलेल्या औरंजेबाला इथेच मूठमाती दिली. त्याचे प्रतीक ही कबर आहे; म्हणूनच 'मराठ्यांच्या शौर्याचे स्मारक' या ठिकाणी उभारण्याची मागणी खासदार डॉ. कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून केली आहे. यासंदर्भात जारी केलेल्या व्हिडीओमध्ये खासदार डॉ. कोल्हे यांनी 'कुणाची राजकीय पोळी भाजण्यासाठी स्वतःच्या आयुष्याची होळी होऊ देऊ नका' असे आवाहन तरुणाईला केले आहे. खा. डॉ. पुढे म्हणाले, सत्ता येते-जाते, राज्यकर्ते येतात-जातात, बदलतात; पण एकदा का केसेस तुमच्या पाठीमागे लागल्या, तर या केसेसपायी तुमच्या करिअरची राखरांगोळी होऊ शकते. तुमच्या पालकांनी ज्या खस्ता खाऊन तुमचे शिक्षण केले, तुमच्या करिअरची स्वप्ने पाहिली, त्या करिअरच्या स्वप्नांना, आई-वडिलांच्या स्वप्नांना कुणाची तरी राजकीय पोळी भाजण्यासाठी नख लागू देऊ नका.

# अक्षय महाराज पिंगळे यांना युवा कीर्तन रत्न पुरस्कार प्राप्त

**पुणे । प्रतिनिधी**

आज दिनांक १८ -०३-२०२५ मंगळवार रोजी तुकाई ज्ञानपीठ पाले तालुका अंबरनाथ जि.ठाणे येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.महाराष्ट्रामध्ये विविध विषयावरती युवकांमध्ये वारकरी परंपरेची जागृती केल्या प्रीत्यर्थ श्री अमृत आश्रम स्वामी यांच्या कीर्तनानंतर संस्थेचे अध्यक्ष प्रबोध मार्तंड श्री विश्वनाथ वारिंगे महाराज व श्री भारतानंद सरस्वती स्वामी महाराज अखिल भारतीय संत समिती (म.राज्य) यांच्या हस्ते अक्षय महाराज पिंगळे (काटवटवाडी) जिल्हा बीड यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले याप्रसंगी कोकण प्रांतातील रायगड,ठाणे,मुंबई ,प्रभागातील अनेकविध लोक उपस्थित होते



तसेच तालमणी विकास बेलुकर गायक प्रकाश कातकडे,सदानंद महाराज ,वैभव मनोहर कडु, मौनी बाबा,रत्नाकर महाराज विठ्ठल महाराज व पत्रकार बांधव उपस्थित होते

# तीर्थक्षेत्र देहूत शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

**देहूगाव । प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र देहू येथे शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने तिथीनुसार छत्रपती श्री शिवाजी महाराज यांची ३९५ जयंती सोमवारी ( दि.१७ ) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

देहूगाव, विठ्ठलवाडी, माळवाडी, बोडकेवाडी आणि झेंडेमाळा परिसरातून .एक गाव एक शिवजयंती दरवर्षी साजरा करण्यात येते. यंदा श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखी, सरदार कान्होजी जेधे, सरलष्कर मोहिते हंबीरराव, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जिरेटोप आणि श्री संत तुकाराम महाराज यांची पगडी असलेले भक्ती शक्ती रथ , धर्मवीर संभाजीराजे यांच्या प्रतिमेचा देखावा तर श्रीराम भक्त बलशाली हनुमानाच्या पुढे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळ्याची मिरवणूक विठ्ठलवाडी



येथून सायंकाळी प्रारंभ करण्यात आला.

तत्पूर्वी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आरती करण्यात आली. त्यानंतर ढोल ताशांच्या गजरात मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आले. श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज की जय ,जय भवानी जय शिवाजी , प्रभू श्री रामचंद्र की जय , बलशाली हनुमान की जय, अशा जोरदार घोषणा देताना परिसर दुमदुमून गेला होता. विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, सामाजिक, राजकीय, शासकीय, निमशासकीय, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने शिवभक्त मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते. यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती.

मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी रांगोळ्यांच्या पायघड्या घालण्यात आल्या . मिरवणूक देहू आळंदी मार्गे विद्युत रोषणाईने सजविलेल्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ आल्यानंतर छत्रपती श्री शिवाजी महाराज यांची आरती करण्यात आली .त्यानंतर मुख्य कमानीवरून आतिषबाजी करण्यात आली. त्यानंतर मिरवणुक छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक, धर्मवीर संभाजी महाराज चौक मार्गे मुख्य मंदिराजवळ महाद्वार चौकामध्ये आल्यानंतर मिरवणुकीची सांगता करण्यात आली. छत्रपती श्री शिवाजी महाराजांची भव्य मिरवणूक व देखावा पाहण्यासाठी पंचक्रोशीतूनच नव्हे तर जिल्ह्यातून शिवभक्तांनी तीर्थक्षेत्र देहूत हजेरी लावली होती. पोलिसांचा बंदोबस्त ही मोठ्या प्रमाणात तैनात करण्यात आला होता. यावेळी देहूत येणारे मार्ग थोड्या वेळासाठी बंद करण्यात आले होते.

# तळेगाव येथील कृषी पणन मंडळ कर्मचाऱ्यांचे बेमुदत उपोषण




**तळेगाव दाभाडे । प्रतिनिधी**

येथे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुढाकारातून स्थापन झालेली राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था फलोत्पादनासह विविध शेती विषयक प्रशिक्षणासाठी ५० एकर जागेवर कार्यरत आहे. या संस्थेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मागील सहा महिन्यांपासून वेतन, भत्त्यांसह अन्य आर्थिक लाभ थकित आहेत. यामुळे कर्मचाऱ्यांची उपासमार होण्याची शक्यता निर्माण झाली असल्यामुळे सोमवारी (दि.१७)पासून सुधीर वाघ सहाय्यक व्यवस्थापक प्रकल्प यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मागण्यांसाठी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. सदर उपोषणास सर्व अधिकारी,कर्मचारी आणि कंत्राटी कामगार यांनी पाठिंबा दर्शविलेला आहे.

संस्थेतील अधिकारी कर्मचारी यांचे गेले सहा महिने वेतन भत्ते व इतर आर्थिक लाभ प्रलंबित असल्यामुळे आर्थिक दृष्ट्या संकटात सापडले आहेत.यामुळे संस्थेचे कर्मचारी संचालक, सचिव व पणन मंत्री यांना वारंवार भेटून निवेदन देत आहेत व मार्ग काढण्यासाठी विनंती करत आहेत.